||श्री राम समर्थ|| ||श्री नागनाथ प्रसन्न||
महेश गायकवाड
मो. ९७६७०४०८४३ ७७४१०८४५४५
श्री शारदा रोपवाटिका
टोमॅटो, मिरची, वांगी, झेंडू, कलिंगड, खरबूज, कोबी, फ्लॉवर, शिमला मिरची, ऊस-८६०३२, २६५, पपई (७८६), पपई आइस बेरी इ.
आमच्याकडे वरील सर्व जातीची ट्रे मधील व गादी वाफ्यावरील दर्जेदार रोपे तसेच ग्रँड-जी ९ केळी रोपे शोभेची झाडे योग्य दरात मिळतील.
सोलापूर-पुणे रोडवर, मोहोळ, कृषी विज्ञान केंद्राच्या पाठीमागे, मोहोळ.



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



विकास वॉटरप्रुफिंग
घर व बंगला गळतीपासून राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरेंटीने लिकेच थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २३३ वा | शुक्रवार, दि. २४ एप्रिल २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR



सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!
श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे
वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.
1299/- प्रति स्क्वे. फूट
मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर मार्डी-नात्रज डांबरी रोडटच तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.
9763764949



आरोग्यविषयक
मुळव्याध आहे?
ऑपरेशन चा विचार करत असाल तर थांबा ऑपरेशन करून देखील कित्येक जणांचा त्रास पुर्वी पेक्षा भयंकर व उग्र रूप धारण करून पुन्हा उद्भवू शकतो म्हणून प्राचिन भारतीय आयुर्वेदिक अतिशय दुर्मिळ औषधींचा वापर करून बनवलेल्या मुळव्याध मुक्ती औषधांचा वापर करून रक्त पडणे, जखम होणे, कोंब (मोड) यांच्या वेदना, भयंकर आग (जळजळ), असह्य खाज, पचन क्रिया बिघडणे, बद्धकोष्ठता (शौचत्रास, मलावरोध, मलाचे खडे होणे) गॅसेस चा त्रास इ. सर्व समस्यांवर सुरक्षित, दुष्परिणाम रहीत, कायमस्वरूपी इलाजासाठी निः संकोच संपर्क साधावा.
संपर्क :
कुदरत हर्बल्स किल्लारी ता: औसा जि. लातुर
मो.नंबर 9970115450



शिनगारे सिटी वासुद रोड अल्टिमेट जिमच्या समोर सांगोला
प्लॉट देणे आहे
N.A.
3100 sft- 3200 sft
- : संपर्क : -
शिनगारे.जे.एम
8275274353
डी.बी.शिंदे
9579421465



VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007


# 'शिवाजी कोण होता' पुस्तकाच्या प्रकाशकाला घरात घुसून मारण्याची धमकी

## आ.संजय गायकवाडांना 37 वर्षांनी आली जाग!

## 'पानसरेंचं काय झालं माहितीये ना?'; असे म्हणत धमकी

## आ. संजय गायकवाड यांच्याविरोधात तक्रार दाखल

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** दिवंगत प्राध्यापक गोविंद पानसरे यांनी 37 वर्षांपूर्वी छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर लिहलेल्या 'शिवाजी कोण होता?' या पुस्तकावरून आता नवा वाद सुरू झाला आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे सतत वादग्रस्त वक्तव्य करणारे आमदार संजय गायकवाड यांनी या पुस्तकाच्या नावावर आक्षेप घेतला आहे.

संजय गायकवाड यांनी या पुस्तकाचे प्रकाशक प्रशांत आंबी यांना फोन करून थेट जीवे मारण्याची धमकी दिल्याने एकच खळबळ उडाली आहे. गायकवाड यांनी शिवाजी महाराजांचा अनादर केल्याचे म्हणत आंबी यांन शिवीगाळ आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याची एक ऑडिओ क्लिप सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. शिवाय ही ऑडिओ क्लीप माझीच असल्याचं आमदार गायकवाड यांनी मान्य केलं आहे.

**आमदार गायकवाड नेमकं काय म्हणाले?**

या ऑडिओ क्लिपमध्ये आमदार संजय गायकवाड म्हणतात की, "शिवाजी कोण होता? असा एकरी उल्लेख का केलाय तुम्ही शिवाजी महाराजांना एकेरी बोलता का? त्यावर प्रशांत आंबी म्हणतात की, "हे पुस्तक गोविंग पानसरे यांनी लिहिलं आहे."

नंतर गायकवाड म्हणतात : अरे तो कोण आहे? तुला माहितेय ना गोविंग पानसरेचे काय हाल केलेत.

प्रशांत आंबी : हो माहितेय मला.

गायकवाड : मग ब्राह्मण आहे का तू?

आंबी : मी ब्राह्मण नाही.

गायकवाड : जास्त शहाणपणा करू नको मी आमदार संजय गायकवाड आहे. घरात घुसून मारेन साल्या.

आंबी : धमक्या देऊ नका.

गायकवाड : मी व्यवस्थीत बोलतोय तू लिहिलं कसं? तु राहतो कुठं?

आंबी : मी कोल्हापुरात राहतो.

गायकवाड : मी घरात घुसून मारेन. ते म्हणाले नाव आणि बदल तुझी भाषा बदलं, अशी धमकी गायकवाड यांनी दिली.

दरम्यान, प्रशांत आंबी यांनीही संजय गायकवाडांना 'तुम्ही उद्या माझी जीभ कापायला या', असं प्रत्युत्तर दिलं. दरम्यान, या सगळ्या प्रकरणावर गायकवाड यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. गायकवाड म्हणाले, ज्या पद्धतीने त्याने जी मुजोरी ठेवली मी त्याला विचारत असताना तो मला सारखा डिवचतं होता.


म्हणून मी जीभ हासडायची भाषा केली आणि अशा लोकांना शंभर टक्के जीभ हासडायची भाषा केली पाहिजे. शिवाय अशा पुस्तकांमध्ये जी शिवरायांबद्दल एकेरी भाषा वापरली आहे ती आम्ही या महाराष्ट्रात नाही सहन करू शकत, असंही गायकवाड यांनी म्हटलं आहे.

मुंबईत आमदार निवासातील कँटीनमध्ये कर्मचाऱ्याला मारहाण करणारे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आमदार संजय गायकवाड पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. दिवगंत कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या शिवाजी कोण होता? या पुस्कतावरून त्यांनी संताप व्यक्त केला. पण हा संताप व्यक्त करताना या यांच्या पुस्तकाचे प्रकाशक प्रशांत आंबी यांना अश्लील शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिली. यावरून आता राज्यभर संताप व्यक्त केला जात आहे. दरम्यान आता कोल्हापुरात या प्रकरणी प्रकाशक आंबी यांनी तक्रार अर्ज दाखल केली आहे.

आमदार गायकवाड यांनी प्रकाशक प्रशांत आंबी यांना फोन करुन अश्लील शिवीगाळ केली होती. या फोन कॉलचा कथित ऑडीओ समाज माध्यमांवर प्रचंड व्हायरल झाला. ज्यात आमदार गायकवाड छत्रपती शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख करणारा गोविंद पानसरे कोण? असे म्हणत गोविंद पानसरे यांच्याबद्दल अपशब्द वापरले होते.

आंबी यांना घरात घुसून मारीन, चिरडून टाकण्याची आणि जीभ कापून टाकण्याची धमकी दिली होती. तसेच, पानसरेंचे काय झाले? माहिती आहे ना? असाही इशारा दिला होता. यानंतर आता कोल्हापुरात या प्रकरणाचे तीव्र पडसाद उमटले असून आमदार गायकवाड यांच्याविरोधात आंदोलन केले जात आहे. तसेच आमदार गायकवाड यांच्या अटकेची मागणी केली जात आहे.

शहरातील राजारामपूरी पोलिस ठाण्यात आमदार गायकवाड यांच्या विरोधात प्रकाशक प्रशांत आंबी यांनी तक्रार अर्ज दाखल केला आहे. यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी केली आहे. तर पोलिसांनी याबाबत माहिती देताना योग्य तो तपास करून पुठील कारवाई करू असे म्हटले आहे. दरम्यान आमदार गायकवाड यांच्याविरोधात आंदोलन करणाऱ्या आंदोलकांना पोलिसांनी ताब्यात घेतले. ज्यामुळे तणाव निर्माण झाला होता. यावेळी आंदोलनकांनी गायकवाड यांच्या पुतळ्याला जोडे मारले तसेच जोरदार निदर्शने केली आहे.



**रोहिणी खडसेंकडून समाचार**

"दिवंगत कॉम्रेड गोविंद पानसरे यांनी तब्बल ३७ वर्षांपूर्वी लिहलेल्या 'शिवाजी कोण होता', या पुस्तकाच्या शीर्षकाबाबत गायकवाड यांना अचानक साक्षात्कार झाला आहे. त्यांनी या पुस्तकाचे प्रकाशक प्रशांत आंबी यांना फोन करुन जीवे मारण्याची धमकी दिली आहे. गायकवाड यांच्याकडून आपण अपेक्षा तरी काय करू शकतो ? वाचन आणि त्यांचा काही दूर दूरपर्यंत काही संबंध असेल याची शक्यता कमीच आहे. पण समाजात वितुष्ट निर्माण करण्यात, लोकांमध्ये संभ्रम निर्माण करण्यात सत्ताधाऱ्यांनी पीएचडी घेतल्याची टीका शरद पवार यांच्या राष्ट्रवादीच्या नेत्या रोहिणी खडसे यांनी टीका केली आहे.

**वकील सरोदेंचे थेट गायकवाडांना आव्हान**

तर वकील असीम सरोदे यांनी थेट गायकवाडांना आव्हान देत 'शिवाजी कोण होता' या पुस्तकांचे जाहीर वाचन आपण बुलढाण्यात लवकरच करणार असल्याचे जाहीर केले. तसेच गायकवाड काय करतात हे बघू असेही आव्हान दिले आहे.

# शक्तिपीठ महामार्गाविरोधात पंढरपुरात शेतकऱ्यांचा एल्गार

## संयुक्त मोजणी रोखण्याचा इशारा

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी शक्तिपीठ महामार्गास जोरदार विरोध दर्शवला आहे. या प्रश्नी आज गुरुवारी (दि.२३ एप्रिल) स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांच्या उपस्थितीत पंढरपूर येथील शासकीय विश्रामगृहात शक्तिपीठ विरोधी कृती समितीची बैठक झाली.



राज्य सरकारने जबरदस्तीने शेतकऱ्यांची संयुक्त जमीन मोजणी करण्याचे प्रयत्न केल्यास संबंधित अधिकाऱ्यांना जशास तसे उत्तर देऊ, असा इशारा शेट्टी यांनी यावेळी दिला.

भूसंपादनाच्या मोबदल्याची चुकीची आकडेवारी सांगितली जात आहे. अशा पद्धतीने राज्य सरकार शेतकऱ्यांची दिशाभूल करून शक्तिपीठ महामार्ग पुढे रेटण्याचा प्रयत्न करत आहे. सोलापूर जिल्ह्यातील शेतकरी उसासह फळबागा, द्राक्षे, केळी यासारखी पिके घेत आहे. पण या महामागार्मुळे पिकाखालील बागायती क्षेत्रात मोठी घट होणार आहे. यामुळे येथील अनेक ग्रामपंचायतींनी महामार्गास विरोध केला आहे. सध्या सोलापूर जिल्ह्यातून सांगली, कोल्हापूर, सातारा आणि कराड याठिकाणी जाण्यासाठी पयार्यी सहा रस्ते उपलब्ध आहेत. असे असताना हा महामार्ग कशाला? असा सवाल शेट्टी यांनी केला आहे.

**वाळू उपसासाठी भीमा नदीपात्र कोरडे ठेवले, पिके वाळू लागली**

त्याबरोबरच उजनी धरणातून भीमा नदीत पाणी सोडणे बंद असल्याने शेतपिके वाळू लागली आहेत. वाळू ठेकेदारांशी संगनमत करून वाळू उपसा करण्यासाठी नदीपात्र कोरडे ठेवले जात आहे. यामुळे तातडीने पाण्याचा पुरवठा सुरू करण्यात यावा अन्यथा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी आणि शेतकरी मिळून भीमा नदीपात्रात आंदोलन करतील, असाही इशारा देण्यात आला आहे.

यावेळी झालेल्या बैठकीत स्वाभिमानी संघटनेचे सोलापूर जिल्हाध्यक्ष विजय रणदिवे, तानाजी बागल, सचिन शिंदे, अजित बोरकर, काका पाटील, सचिन आडके यांच्यासह कार्यकर्ते आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोलापूर जिल्ह्यातील १९ कृषी केंद्रांचे परवाने निलंबित

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शेतकऱ्यांना जादा दराने खते आणि बियाण्यांची विक्री करणाऱ्या, तसेच त्यांना फसवणाऱ्या १९ कृषी केंद्रांवर सोलापूर जिल्हा कृषी विभागाने धडक कारवाई केली आहे. या केंद्रांचे विक्री परवाने तात्पुरत्या कालावधीसाठी निलंबित करण्यात आले आहेत, तर नियमांचे उल्लंघन करणाऱ्या दोन दुकानदारांवर थेट गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.



जिल्ह्यातील ११ तालुक्यांतून शेतकऱ्यांनी कृषी केंद्रांकडून होणाऱ्या फसवणुकीच्या तक्रारी कृषी अधीक्षक कार्यालयाकडे केल्या होत्या. या तक्रारींची गंभीर दखल घेत कृषी अधिकारी आणि तालुका गुणवत्ता निरीक्षकांच्या पथकाने तपासणी केली. या तपासणीमध्ये अनेक ठिकाणी खतांच्या विक्रीत अनियमितता, अवाजवी दराने पावती देणे आणि नियमापेक्षा अधिक साठा करणे असे प्रकार समोर आले. या पार्श्वभूमीवर, १५ एप्रिल रोजी संबंधित दुकानदारांची सुनावणी घेण्यात आली होती.

तपासणीदरम्यान ज्या दोन ठिकाणी गंभीर अनियमितता आढळली, त्यांच्यावर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे, त्यात हन्नूर (ता. मंगळवेढा) येथील 'गोवर्धन कृषी केंद्र' येथे विनापरवाना अधिक साठा आढळला तर मोडनिंब येथील 'सुकांत जयकुमार दोशी कृषी केंद्र' येथेही विनापरवाना अधिक साठा आढळला, या दोन्ही दुकानदारांवर आता गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत.

शेतकऱ्यांची दिशाभूल किंवा फसवणूक करणाऱ्या कृषी सेवा केंद्रांविरुद्धची ही मोहीम यापुढेही सुरू राहणार आहे. भविष्यात अशा प्रकारची कोणतीही फसवणूक खपवून घेतली जाणार नाही आणि दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा कृषी विभागाने दिला आहे.

**युरियाचा वापर संशयास्पद**

जिल्ह्यात मार्च २०२५ मध्ये जिल्ह्यात १५ हजार मेट्रिक टन युरिया वापरला होता. मात्र, मार्च २०२६ मध्ये हा वापर थेट २२ हजार मेट्रिक टनावर पोहोचला आहे. ही कमालीची वाढ संशयास्पद असून, या प्रकरणाची सखोल पडताळणी करण्यासाठी जिल्ह्यातील ३,००० ते ३,५०० शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला जाणार आहे, असे कृषी विभागाकडून सांगण्यात आले.

# मोहोळमध्ये श्री नागनाथ महाराज यात्रेदरम्यान पेहरावावरून वाद

## पोलिसांच्या मध्यस्थीनंतर मिरवणूक शांततेत

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातून एक मोठी बातमी समोर आली आहे. मोहोळ येथील ग्रामदैवत श्री नागनाथ महाराज यांच्या वार्षिक यात्रेदरम्यान पेहरावाच्या कारणावरून दोन गटांत झालेला वाद पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करून मिटवला.



पोलिसांच्या समयसूचकतेमुळे मोठा अनर्थ टळला असून, पालखी मिरवणूक शांततेत पार पडली. सध्या शहरात शांतता असून, चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार २२ एप्रिल रोजी रात्री ९:१५ च्या सुमारास श्री खर्गे महाराज मिरवणुकीसाठी आले असता, त्यांनी भगवा फेटा आणि भगवी कफनी परिधान केली होती. या पेहरावावर इतर मानकरी आणि काही तरुणांनी आक्षेप घेतला. 'केवळ पांढरा फेटा आणि पांढरा गणवेश' असावा या आग्रहावरून दोन्ही गटांत शाब्दिक चकमक उडाली.

या वादामुळे मिरवणूक निघण्यास उशीर झाला. पालखी सोहळ्यासाठी जमलेले सुमारे ४ ते ५ हजार भाविक या अचानक उद्भवलेल्या गोंधळामुळे काही काळ घाबरले होते. या घटनेचे गांभीर्य ओळखून मोहोळ पोलिसांनी तातडीने दोन्ही बाजूंना शांत केले. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दोन्ही गटांशी सविस्तर चर्चा केली. अखेर, सवार्नुमते खर्गे महाराज यांनी पांढरा गणवेश परिधान करण्याचे मान्य केले आणि वादावर पडदा पडला.

वाद मिटल्यानंतर नागनाथ महाराजांची मिरवणूक उत्साहात सुरू झाली. आकर्षक अशा शोभेच्या दारूकाम कार्यक्रमानंतर मिरवणूक शांततेत संपन्न झाली. यात्रेच्या पार्श्वभूमीवर मोहोळ पोलिसांनी आधीच खबरदारी म्हणून नागनाथ महाराज ट्रस्टच्या १५ सदस्यांची बैठक घेऊन त्यांना आवश्यक सूचना दिल्या होत्या.

'मानपमानाच्या किरकोळ गोष्टी विसरून जाऊन यात्रेचा आनंद घ्या. सध्या मोहोळ शहरात पूर्णपणे शांतता आहे. अफवांवर विश्वास ठेवू नये. पोलीस प्रशासन परिस्थितीवर लक्ष ठेवून असून, शहरात पुरेशा प्रमाणात बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.'

**-बाजीराव पोवार**
पोलीस निरीक्षक, मोहोळ

# जनगणना 2027 साठी सोलापूरमध्ये प्रशिक्षण

## पहिल्यांदाच डिजिटल पद्धतीने होणार जनगणना

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जनगणना 2027 बाबतीत प्रगणानं (कर्मचारी) आणि पर्यवेक्षक यांचे प्रशिक्षण हुतात्मा स्मृती मंदिर येथे आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणाद्वारे जनगणना 2027 बाबतीतील कामकाजाची माहिती व कसे जनगणना आपल्या पार पाडायचे आहे याबाबतीतील प्रशिक्षणासाठी सर्व प्रगनं व पर्यवेक्षक यांना बोलावून प्रशिक्षण आयोजित केल्या गेले होते यादरम्यान माहिती देण्यात आली की सदर जनगणना ही 16 वी जनगणना आणि भारताचा 155 वर्षाची जनगणनेचा वारसा आहे लास्ट ची जनगणना ही 2018 रोजी 2018 दरम्यान केली गेली होती पुढील जनगणना ही 2021 च्या आसपास नियोजित होती परंतु कोरोना कालावधी असल्याकारणाने सदरील जनगणना होऊ शकली नाही या कारणामुळे 2026 27 या कालावधी दरम्यान सदरचे जनगणनेचे आयोजन केले आहे आणि महत्त्वाचे पाहायला गेल्यास यावेळी जनगणना ही पारंपारिक मॅन्युअली पद्धतीने न होता यावेळी डिजिटल प्रणाली द्वारे जनगणना केली जाणार आहे. एच एल ओ या ॲप द्वारे जनगणना केली जाणार आहे. एक मे ते 15 मे या दरम्यान नागरिकांना जनगणना करता येणार आहे. आणि 16 मे ते 15 जून या दरम्यान द्वारे जनगणना केली जाईल. त्या संबंधित प्रकरणांना प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांनी जनगणना संदर्भात सुरू असलेल्या शिबिरामध्ये उपस्थित अधिकारी, कर्मचारी व नागरिकांना सविस्तर मार्गदर्शन केले. आपल्या मार्गदर्शनात त्यांनी जनगणनेचे राष्ट्रीय विकासातील महत्त्व अधोरेखित करताना अचूक व विश्वसनीय माहिती संकलन हेच नियोजनाचे भक्कम अधिष्ठान असल्याचे सांगितले.तसेच, जनगणना प्रक्रियेदरम्यान नियुक्त केलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडावी, घराघरात जाऊन माहिती संकलन करताना नागरिकांशी सौजन्याने वागावे, तसेच कोणतीही माहिती अपूर्ण किंवा चुकीची राहणार नाही याची दक्षता घ्यावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. या शिबिरामध्ये जनगणनेच्या प्रक्रियेविषयी सविस्तर माहिती, आवश्यक कागदपत्रे, माहिती संकलनाची पद्धत तसेच उद्भवणाऱ्या अडचणींवर उपाय याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. नागरिकांनी जनगणना अधिकाऱ्यांना सहकार्य करून अचूक माहिती द्यावी, असे आवाहनही आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी यावेळी केले.यावेळी अतिरिक्त आयुक्त तथा नियंत्रण अधिकारी संदीप कारंजे, म उपायुक्त तथा शहर जनगणना अधिकारी आशिष लोकरे, सहायक आयुक्त तथा चारच अधिकारी गिरीश पंडित, माननीय सहाय्यक आयुक्त तथा चार्ज अधिकारी शशिकांत भोसले, जिल्हा जनगणना समन्वय अजित बांड (जनगणना कार्यालय मुंबई), सहाय्यक चार्ज अधिकारी/विभागीय अधिकारी- सरकाजी, सहाय्यक चार्जे अधिकारी/विभागीय अधिकारी - सुनिता हिबारे सूत्रसंचालन श्रीमती रूथ भंडारे. व सर्व प्रकरण व प्रशिक्षक उपस्थित होते.



# सिद्धेश्वर एक्सप्रेसमधील दरोड्याचा कट उधळला

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मध्य रेल्वेच्या आरपीएफ पथकाने सिद्धेश्वर एक्सप्रेसवर दरोडा टाकण्याचा कट रचणाऱ्या ९ महिलांना अटक केली. टेहळणी करत असलेली ही टोळी दक्षतेमुळे सोलापूरमध्ये पकडली गेली. मिळालेल्या माहितीनुसार मध्य रेल्वेच्या आरपीएफ पथकाने सिद्धेश्वर एक्सप्रेसमधील दरोड्याचा प्रयत्न उधळून लावला आणि महिला टोळीच्या ९ महिला सदस्यांना अटक केली.



मिळालेल्या माहितीनुसार, आरपीएफ पथकाने त्यांना पकडण्यापूर्वी या महिला ट्रेनमध्ये दरोडा टाकण्याचा कट रचत होत्या.

रोहित पवारांचे खुले आव्हानः अहवाल २ आठवड्यांत आला, तर मंत्र्यांचा सत्कार करेन; अन्यथा, हा 'नाटकीपणा' थांबवा!

त्या आधी टेहळणी करत होत्या. २२ एप्रिल रोजी मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील कुर्डुवाडी स्थानकावर तैनात असलेल्या गुन्हे प्रतिबंध आणि शोध पथकाचे (CPDS) हेड कॉन्स्टेबल शिवाजी मुंडे यांना तीन महिला संशयास्पदरित्या फिरताना दिसल्या. त्या कुठे होत्या याबद्दल त्यांची चौकशी करण्यात आली आणि स्थानक सोडण्याचा इशारा देऊन त्यांना सोडून देण्यात आले.

या महिला लातूर एक्सप्रेसमध्ये चढताना दिसल्या, त्यामुळे सोलापूर पथकाने संपूर्ण विभागासाठी हाय अलर्ट जारी केला. असा विश्वास आहे की, या महिला रेल्वेमध्ये चोरी करण्यापूर्वी टेहळणी करत होत्या. संशयित जेऊर स्टेशनवर उतरल्या, जिथे त्यांनी चोरी करण्याच्या उद्देशाने सिद्धेश्वर एक्सप्रेसमध्ये प्रवेश केला.

वात्रटिका

**बडबडे नेते, प्रवक्ते**

गरगर फिरते जाते तरीही
भरडा आणि नुसता चुरा...
फेकाफेकी झाली आणि
आता रंगला कलगीतुरा...

चिखलफेक करून झाली
आता वाभाडे काढले...
कधी नेते, कधी कार्यकर्ते तर
कधी प्रवक्ते बडबडे झाले...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

## संपादकीय

# महानगरातील आरोग्य सेवा, नाव मोठे, लक्षण खोटे !

'आरोग्यम धनसंपदा' ही उक्ती आपण वारंवार ऐकतो; मात्र सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेकडे पाहिले, तर ती केवळ भिंतीवरची अक्षरे ठरतात की काय, असा प्रश्न पडतो. केंद्र सरकारपासून ते महापालिकांपर्यंत आरोग्यावर खर्चाच्या मोठमोठ्या घोषणा केल्या जातात; पण प्रत्यक्षात नागरिकांपर्यंत पोहोचणारी सेवा मात्र अत्यल्प आणि अपुरीच दिसते.

केंद्र सरकारच्या २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयासाठी १.०६ लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तसे बघितले तर ही रक्कम मागील वर्षाच्या तुलनेत सुमारे १० टक्के वाढ दर्शवते. परंतु देशाच्या एकूण अर्थसंकल्पाच्या केवळ २ टक्के आहे. म्हणजेच आरोग्य हा अजूनही प्राधान्यक्रमाच्या यादीत खालच्या स्तरावर आहे.

**महानगरातील आरोग्यावर प्रति व्यक्ती खर्च**

शहरातील नागरिकांना अधिक कार्यक्षम आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, पायाभूत सुविधा वाढवणे, नवीन आरोग्य केंद्रे सुरू करणे आणि अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा पुरवण्याची जबाबदारी महापालिकांवर आहे. राज्यातील मुंबई, पुणे आणि नागपूर या प्रमुख महापालिकांकडे पाहिले, तर त्यांनी राष्ट्रीय आरोग्य धोरणानुसार आठ टक्क्यांपेक्षा जास्त म्हणजे ११ ते १५ टक्क्यांपर्यंत निधी आरोग्यासाठी राखून ठेवला. कागदोपत्री हे चित्र आदर्श वाटते. पण प्रत्यक्षात आकडे खोलात जाऊन पाहिले, तर वास्तव धक्कादायक आहे. हा खर्च 'मृगजळ'सारखा भासतो. नागपूर महापालिका एका नागरिकावर दररोज केवळ सहा ते सात रुपये खर्च करते. पुण्यात हा खर्च सुमारे १५ रुपये, तर मुंबईत १३ रुपये आहे. एवढ्या अल्प खर्चात दजेर्दार आरोग्य सेवा देणे शक्य आहे का, हा मूलभूत प्रश्न आहे. मुंबई महापालिका प्रशासनाचा अर्थसंकल्प ८०,९५२ कोटी असून आरोग्यासाठी ९,०५६ कोटींची तरतूद आहे. (एकूण अर्थसंकल्पाच्या ११.२ टक्के) पुणे महापालिकेने १५,६६९ कोटींच्या अर्थसंकल्पात २,२७१ कोटीं (१४.५ टक्के) आणि नागपूर महापालिकेने ५,५४१ कोटींच्या अर्थसंकल्पात आरोग्यासाठी ७२९ कोटी (१३ टक्के) केली आहे.

**कचरा व्यवस्थापनावर अधिक खर्च**

आरोग्य सुविधांबाबत महापालिकांच्या अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदीचे आकडे मोठे वाटत असले तरी त्यातील बराच मोठा खर्च हा कचरा व्यवस्थापनावर होताना दिसून येतो. नागपूरच्या बाबतीत परिस्थिती अधिक चिंताजनक आहे. अर्थसंकल्पात आरोग्यासाठी ७२९ कोटी रुपयांची तरतूद असली, तरी त्यातील मोठा हिस्सा स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापनावर खर्च होतो. औषधे, उपचार आणि रुग्णसेवा यासाठी असलेला निधी तुलनेने अत्यल्प आहे. तज्ज्ञांच्या मते, किमान २० रुपये प्रतिव्यक्ती दररोज खर्च होणे आवश्यक आहे. याहून गंभीर बाब म्हणजे, उपलब्ध निधीचाही योग्य वापर होत नाही. आयुर्वेदिक दवाखान्यांसाठी औषध खरेदीच दोन वर्षापासून झालेली नाही. एकीकडे केंद्र सरकार 'आयुष'ला प्रोत्साहन देत असताना, स्थानिक पातळीवर मात्र त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. मुंबईतही प्रत्यक्ष आरोग्यासाठी केलेल्या एकूण तरतुदींपैकी १,६०० कोटी स्वच्छता, कचरा आदीसाठी, अशी एकूण ९०५६ कोटींची तरतूद आहे. पुणे शहराची लोकसंख्या ४० लाखांच्या घरात असून या महापालिकेने २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात आरोग्य औषधी विभागासाठी एकूण २२७१ कोटींची तरतूद केली. यात स्वच्छतेसाठी १३९० कोटींचा समावेश आहे.

**केंद्राच्या निधीवर अवलंबित्व**

महापालिकांच्या आरोग्य यंत्रणेची दुसरी मोठी अडचण म्हणजे केंद्राच्या निधीवर असलेले अवलंबित्व. महापालिकांना केंद्र सरकारकडून राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत (एनयूएचएम) निधी मिळतो. यात केंद्र सरकार ७५ टक्के तर राज्य सरकार २५ टक्के निधी देते. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे (यूपीएचसी), नागरी सामुदायिक आरोग्य केंद्रे (यूसीएसी) आणि आरोग्य तपासणी केंद्रे उभारण्यासाठी तसेच डॉक्टर, परिचारिकांचे वेतनही याच निधीतून दिले जाते. महापालिकांना केंद्राच्या निधीवर अवलंबून राहावे लागते. केंद्राकडून निधी मिळण्यास विलंब झाल्यास त्याचा थेट परिणाम सेवांवर होतो. परिचारिका, आशा कार्यकर्त्यांचे वेतन महिनोनमहिने थकते. परिणामी आंदोलन, कामबंद यामुळे आरोग्य सेवा खंडित होते. एवढेच नव्हे १५ व्या वित्त आयोगाचा निधीही महापालिकेला मिळतो. तो आरोग्य सेवांवरही खर्च होतो. परंतु मार्च २०२२ पासून महापालिकेत लोकप्रतिनिधी (नगरसेवक) नसल्यामुळे आणि प्रशासक राजवट असल्याने १५ व्या वित्त आयोगाच्या अटी पूर्ण न झाल्यामुळे निधी रोखून धरण्यात आला होता. एकट्या नागपूर महापालिकेचा सुमारे २७० कोटी रुपयांचा निधी अडकला होता. लोकप्रतिनिधी नसल्याने निर्णयप्रक्रिया ठप्प झाली आणि त्याचा फटका थेट नागरिकांना बसला. मुंबईसारख्या महानगरात स्वतःची मजबूत आरोग्य यंत्रणा असल्याने काही प्रमाणात परिस्थिती नियंत्रणात आहे. मात्र पुणे आणि नागपूरसारख्या शहरांना केंद्राच्या निधीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहावे लागते. त्यामुळे आरोग्य सेवा पुरवताना अनेक मयार्दा येतात. आता नव्याने निवडून आलेल्या महापालिका पदाधिकार्यांच्या प्रयत्नांमुळे महापालिकेला निधी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

**तरतुदीचे आकडे मोठे, सेवा अपुरी**

राज्यातील मुंबई, पुणे, नागपूर या महानगरातील महापालिकांची आरोग्यासाठीची तरतूद कागदावर आकर्षक दिसत असली, तरी प्रत्यक्षात नागरिकांपर्यंत पोहोचणारी सेवा अत्यंत अपुरी आहे. 'नाव मोठे, पण लक्षण खोटे' ही म्हण इथे अक्षरशः खरी ठरते. आरोग्य हा खर्च नसून गुंतवणूक आहे, ही मानसिकता शासन आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी स्वीकारण्याची गरज आहे-हे आपण वषार्नुवर्षे ऐकत आलो. पण आता प्रश्न फक्त मानसिकतेचा राहिलेला नाही, तर उत्तरदायित्वाचा आहे. कोट्यवधी रुपयांच्या तरतुदींचा खरोखर नागरिकांच्या आरोग्यावर किती परिणाम होतो, याचा हिशेब कोण देणार? कागदोपत्री आकडे मांडणे सोपे आहे; पण रुग्णालयाच्या दारात उभ्या असलेल्या सामान्य नागरिकाला त्या आकड्यांमधून काय मिळते, हा खरा कस आहे. महापालिका प्रशासन, राज्य सरकार आणि केंद्र या तिन्ही स्तरांमध्ये जबाबदारी ढकलण्याचा खेळ थांबवणे गरजेचे आहे.

निधी मंजूर झाला, तर तो वेळेत आणि योग्य ठिकाणी पोहोचतो का? त्याचा वापर खरोखर रुग्णसेवेसाठी होतो का? की तो केवळ कागदोपत्री खर्च आणि दिखाऊगिरीपुरता मर्यादित राहतो? या प्रश्नांची स्पष्ट आणि सार्वजनिक उत्तरे देण्याची वेळ आता आली आहे. जर आजही आरोग्य सेवेकडे दुय्यम नजरेने पाहिले गेले, तर उद्या कोणतीही आपत्ती-महासाथ असो किंवा इतर आरोग्य संकट-महानगरांची वास्तविकता उघडी पाडेल. तेव्हा आकडे नव्हे, तर व्यवस्थेची उणीवच नागरिकांच्या जिवावर बेतू शकते. म्हणूनच आता घोषणांपेक्षा कृती आणि आकड्यांपेक्षा परिणाम महत्त्वाचे ठरले पाहिजेत. अन्यथा 'नाव मोठे, पण लक्षण खोटे' ही म्हण केवळ टीका राहणार नाही, तर आपल्या आरोग्य व्यवस्थेचे कटू वास्तव बनून राहील.

**छोट्या शहरातील आरोग्य सेवा**

महानगरातील महापालिकांप्रमाणेच राज्यातील ब श्रेणीतील शहरांमधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून देण्यात येर्णाया आरोग्य सेवेची गत झाली आहे. छोट्या शहरांमधील आरोग्य सेवा ही प्राथमिक, दुय्यम आणि काही प्रमाणात तृतीयक सेवांचे मिश्रण आहे, ज्यामध्ये सरकारी आणि खासगी दोन्ही क्षेत्रांचा समावेश होतो. राष्ट्रीय शहरी आरोग्य मिशनअंतर्गत, ५० हजारपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये आरोग्य सुविधा सुधारण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात असले तरी त्यासाठी लागणारा निधी पुरेसा ठरत नसल्याने त्या सक्षम ठरत नाहीत. अनेक केंद्रात किंवा पालिकेच्या रुग्णालयात तज्ज्ञ डॉक्टरांची उपलब्धता (उदा. स्त्रीरोगतज्ज्ञ, सर्जन) मर्यादित प्रमाणात असते. औषध साठा, तपासणीसाठी लागणारी आधुनिक यंत्रसामग्री या रुग्णालयांमध्ये नसते. नगरपालिका, नगर पंचायती आणि क श्रेणीतील महापालिकांकडे उत्पन्नाचा स्रोत मर्यादित असल्याने आरोग्य व स्वच्छता यापैकी स्थानिक स्वराज्य संस्था स्वच्छतेवर भर देतात व आरोग्य सुविधांना दुय्यम स्थान दिले जाते. त्यामुळे राज्यात सर्वच छोट्या शहरातील स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत चालवण्यात येणाऱ्या दवाखान्यात सोयींचा अभाव आढळून येतो.

**आव्हाने आणि समस्याः**

महानगरे असो किंवा छोटी शहरे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून नागरिकांना देण्यात येर्णाया सुविधांपुढे मोठ्या प्रमाणात आव्हाने आहेत. मोठ्या शहरांच्या तुलनेत छोट्या शहरांमध्ये विशेषज्ञ, डॉक्टरांची कमतरता असते. प्रगत निदान सुविधांचा अभावः प्रगत एमआरआय किंवा सीटी स्कॅनसारख्या सुविधांसाठी रुग्णांना अनेकदा मोठ्या शहरात जावे लागते. ही सर्व बाब लक्षात घेऊनच राज्य सरकारने महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना छोट्या शहरातील रुग्णालयांमध्ये कॅशलेस उपचार पुरवते, ज्यामुळे गरिबांना महागडे उपचार घेणे सोपे झाले आहे. इंटरनेटच्या माध्यमातून तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेण्यासाठी टेलिमेडिसिनचा वापर वाढत आहे.

# जागतिक मलेरिया दिन : सावध राहा, सुरक्षित राहा !

'राजू बन गया जंटलमन' या शाहरुख खानच्या चित्रपटातील गीत — "सर्दी खाँसी ना मलेरिया हुआ, मैं गया यारो मुझको लवेरिया हुआ!" — एकेकाळी खूप लोकप्रिय झाले होते. या गाण्याची आठवण होण्याचे कारण म्हणजे आज जागतिक मलेरिया दिन आहे. विनोदी पद्धतीने सांगायचे झाले, तर गाण्यातील नायकाला ह्यलवेरियाह्ण हा काल्पनिक आजार एका सुंदरीमुळे झाला आहे ; पण मलेरिया हा कुप्रसिद्ध आजार मात्र प्लाज्मोडियम (Plasmodium) नावाच्या परजीवीमुळे होतो.

हा परजीवी संक्रमित मादी ॲनोफिलीस (Anopheles) डासाच्या चाव्याद्वारे मानवी शरीरात प्रवेश करतो. जेव्हा हा डास मलेरियाग्रस्त व्यक्तीला चावतो आणि नंतर निरोगी व्यक्तीला चावतो, तेव्हा हा परजीवी निरोगी व्यक्तीच्या रक्तप्रवाहात पसरतो. दरवर्षी २५ एप्रिल रोजी जागतिक मलेरिया दिन पाळला जातो. याचा उद्देश मलेरियाच्या प्रतिबंध, नियंत्रण आणि निर्मूलनासाठी जागतिक स्तरावर जनजागृती करणे हा आहे. जागतिक आरोग्य संघटनेने यावषीर्ची (२०२६) जागतिक मलेरिया दिनाची थीम ठेवली आहे आहे —'मलेरिया संपवण्यासाठी प्रेरित : आता आपण करू शकतो, आता आपण ते केलेच पाहिजे!' (Driven to End Malaria: Now We Can. Now We Must.)



चला, तर मग जाणून घेऊया मलेरियाविषयी अधिक माहिती.

१. मलेरियाची कारणे :हा आजार प्लाज्मोडियम नावाच्या परजीवीमुळे होतो. संक्रमित मादी ॲनोफिलीस डास चावल्यानंतर हा परजीवी रक्तात प्रवेश करतो. हे डास प्रामुख्याने संध्याकाळी व रात्री चावतात.

२. मलेरियाची लक्षणे :
डास चावल्यानंतर काही दिवसांनी खालील लक्षणे दिसू शकतात.
तीव्र ताप व थंडी वाजणे,खूप घाम येणे, डोकेदुखी,मळमळ व उलट्या अंगदुखी व स्नायूदुखी,अशक्तपणा व थकवा,गंभीर स्थितीत कावीळ किंवा बेशुद्धावस्था

३. मलेरियाचे निदान
रक्त तपासणीः सूक्ष्मदर्शकाखाली रक्ताची तपासणी.
RDT चाचणीः रॅपिड डायग्नोस्टिक टेस्टद्वारे त्वरित निदान.

४. मलेरियावरील उपचार
डॉक्टरांच्या सल्ल्याने मलेरियाविरोधी औषधे दिली जातात. काही प्रकरणांत क्लोरोक्विन (Chloroquine) किंवा ACT Therapy वापरली जाते.
लक्षणे दिसताच त्वरित वैद्यकीय मदत घेणे अत्यंत आवश्यक आहे.

५. प्रतिबंधात्मक उपाय :
मलेरिया टाळण्यासाठी डासांपासून संरक्षण हाच सर्वोत्तम मार्ग आहे.
झोपताना मच्छरदाणी वापरा.
पूर्ण अंग झाकणारे कपडे घाला.
डासप्रतिबंधक क्रीम किंवा लोशन वापरा. घराभोवती पाणी साचू देऊ नका. कुलर, टायर, नारळाच्या करवंट्या इत्यादी स्वच्छ ठेवा.
परिसर स्वच्छ ठेवा.

६. महाराष्ट्रातील परिस्थिती :
महाराष्ट्रात मलेरियाचे रुग्ण आणि मृत्यूचे प्रमाण कमी होत असले, तरी काही आदिवासी व दुर्गम भागांत आरोग्य यंत्रणा सतर्क आहे.शासकीय आरोग्य केंद्रांमध्ये मलेरियाची मोफत तपासणी व उपचार सुविधा उपलब्ध आहेत.

महत्त्वाची सूचना :
ताप आल्यास स्वतःहून औषधे घेऊ नका. त्वरित जवळच्या सरकारी रुग्णालयात किंवा डॉक्टरांकडे जाऊन मलेरियाची तपासणी करून घ्या.
मलेरिया हा गंभीर आजार असला, तरी तो टाळता येण्याजोगा आणि बरा होऊ शकणारा आजार आहे. जागरूकता, स्वच्छता आणि वेळेवर उपचार यामुळे अनेक जीव वाचू शकतात. डासांना थारा देऊ नका, मलेरिया पसरू देऊ नका! सावध राहा, स्वच्छ राहा आणि मलेरियामुक्त भारत घडवा!

**- श्री. अजित पवार**
वैज्ञानिक अधिकारी
प्राथमिक आरोग्य केंद्र मार्डी
मोबाइल नंबर 8378950409

# पीसीसीओई जॉब फेअरमध्ये २,२२३ विद्यार्थ्यांना रोजगार

**पिंपरी, पुणे (कटूसत्य वृत्त):-** पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या निगडी येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनियरिंग येथे आयोजित ह्यपीसीसीओई जॉब फेअर २०२६ह्ण मध्ये रोजगार निर्मितीच्या दृष्टीने मोठा टप्पा गाठत उल्लेखनीय यश साध्य केले. पीसीसीओई, भारत सरकारच्या बोर्ड ऑफ अप्रेंटिसशिप ट्रेनिंग (बोट), महाराष्ट्र असोसिएशन ऑफ टीपीओ (एमएटीपीओ) आणि ऑल इंडिया टीपीओ असोसिएशन (एआयटीपीओ) यांच्या सहकार्याने पार पडलेल्या या भव्य रोजगार मेळाव्यात देशभरातील २०५ नामांकित कंपन्यांनी सहभाग नोंदवला. या कंपन्यांनी मिळून १५,००० पेक्षा अधिक रिक्त पदांसाठी ऑनलाईन परीक्षा, ग्रुप डिस्कशन, तांत्रिक मुलाखती व वैयक्तिक मुलाखती घेतल्या. ज्यामध्ये नोकरी, अप्रेंटिसशिप आणि इंटर्नशिपच्या संधींचा समावेश होता. या उपक्रमासाठी एकूण १३,९९१ उमेदवारांनी ऑनलाईन पद्धतीने नोंदणी केली होती. विविध शाखांतील डिप्लोमा, पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. या विस्तृत निवड प्रक्रियेतून २,२२३ उमेदवारांना नोकऱ्या देण्यात आल्या अशी माहिती पीसीईटी सेंट्रल प्लेसमेंट सेलचे अधिष्ठाता डॉ. शितलकुमार रवंदळे यांनी दिली.



राज्यातील विविध जिल्ह्यांमधून विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला. या जॉब फेअरमध्ये कमिन्स इंडिया, पियाजिओ व्हेईकल्स, दाना आनंद इंडिया, टाटा मोटर्स पॅसेंजर व्हेईकल्स, व्हॅरॉक इंजिनिअरिंग, महिंद्रा अँड महिंद्रा, जयहिंद इंडस्ट्रीज, ह्युंदाई, ॲटलस कॉप्को, शिंडलर इंडिया, टेक्समो इंडस्ट्रीज, फॉरेशिया, ब्रेम्बो इंडिया, प्रीमियम ट्रान्समिशन, सँडविक, ल्यूमॅक्स, फियाट इंडिया, भारत संचार निगम लिमिटेड, ईटन, भारत इलेक्ट्रॉनिक्स, फ्लॅश इलेक्ट्रॉनिक्स, एक्साइड इंडस्ट्रीज, टाटा ऑटोकॉम्प, फोर्ब्स मार्शल, जेबीएम ऑटो, युनो मिंडा, महिंद्रा अँड महिंद्रा, धूत ट्रान्समिशन, बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन, हार्मन इंटरनॅशनल, कॉन्टिनेंटल, जॅबिल सर्किट तसेच लिअर ऑटोमोटिव्ह इंडिया यांसारख्या आघाडीच्या कंपन्यांचा सक्रिय सहभाग होता. यामुळे विद्यार्थ्यांना नामांकित उद्योगांमध्ये करिअर घडविण्याच्या संधी उपलब्ध झाल्या.

जॉब फेअरचे उद्घाटन बोर्ड ऑफ अप्रेंटिसशिप ट्रेनिंगचे (बोट) संचालक पी. एन. जुमले, उपसंचालक एन. एन. वडोदे, भारत सरकार कॉर्पोरेट अफेअर मंत्रालयाच्या डेप्युटी डायरेक्टर ऋजुता बनकर, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पर्सोनल मॅनेजमेंटचे सचिव नवनाथ सूर्यवंशी, व्हायब्रंट एच. आर. माइंड्सचे संस्थापक दीपक खोत, अधिष्ठाता डॉ. शितलकुमार रवंदळे आदी उपस्थित होते.

यावेळी डॉ. जुमले यांनी सांगितले की, केंद्र सरकार तांत्रिक व अतांत्रिक प्रशिक्षणार्थींसाठी नॅशनल अप्रेंटिस ट्रेनिंग स्कीमच्या माध्यमातून २०२५-२६ या वर्षात २५० कोटी रुपयांचा केंद्र सरकारचा विद्यावेतन हिस्सा उमेदवारांना देण्यात आला आहे. देशाच्या पश्चिम विभागात ५,५०० आस्थापनांद्वारे १,५१,००० पेक्षा जास्त उमेदवारांना अप्रेंटीसशीपची संधी देण्यात आली. या उमेदवारांनी एक वषार्चा प्रशिक्षण कालावधी पूर्ण केल्यानंतर त्यांना कौशल्य प्रवीणता प्रमाणपत्र देण्यात येते ते नोकरीचा अनुभव म्हणून समजले जाईल. अप्रेंटिसशिप ॲक्टनुसार सर्व क्षेत्रातील कंपन्यांना नॅशनल अप्रेंटिस ट्रेनिंग स्कीम योजनेअंतर्गत उमेदवार नियुक्ती करणे बंधनकारक आहे. बीई, बीटेक, बी फार्मसी, आर्किटेक्ट यासह आता बीएससी, बीकॉम, बीबीए आदी शैक्षणिक अर्हता प्राप्त उमेदवारांना देखील www.nats.education.gov.in या पोर्टलवर नोंदणी करून यामध्ये सहभाग घेता येईल. निवड झालेल्या पदवीधर उमेदवारांना किमान १२,३०० रुपये, पदविका धारकांसाठी किमान १०,९०० रुपये विद्यावेतन देण्यात येते. यापैकी ५० टक्के हिस्सा केंद्र सरकारचा असतो.

कॉर्पोरेट अफेअर मंत्रालयाच्या डेप्युटी डायरेक्टर ऋजुता बनकर यांनी सांगितले की, नवोन्मेषाच्या आघाडीवर असलेल्या कॉर्पोरेट संस्थांमध्ये कौशल्ये आणि प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळवणे, हे यशासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. म्हणूनच, कायमस्वरूपी नोकरीच्या शोधात असतानाच, इंटर्नशिपचा अनुभव घेणे महत्त्वाचे ठरते. २०२४ मध्ये सुरू करण्यात आलेल्या 'पंतप्रधान इंटर्नशिप योजने'अंतर्गत, १८ ते २५ वयोगटातील तरुणांना भारतातील आघाडीच्या कॉर्पोरेट संस्थांमध्ये इंटर्नशिपची संधी देऊन प्रतिमाह ९,००० रुपयांचे मानधन भारत सरकारद्वारे दिले जाते. इंटर्नशिप कालावधी ६ ते ९ महिन्यांचा असतो. आयटीआय, पदविका, पदवी, पदव्युत्तर तसेच १० वी, १२ वी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी या योजनेसाठी पात्र आहेत. या इंटर्नशिपसाठी www.pminternship.mca.gov.in या संकेतस्थळावर माहिती उपलब्ध आहे असे बनकर यांनी सांगितले.

डिप्लोमा बरोबरच कंपन्यांनी डिग्रीच्या विद्यार्थ्यांना देखील संधी द्यायला हवी, असे वडोदे यांनी सांगितले. स्वागत, प्रास्ताविक डॉ. शीतलकुमार रवंदळे, सूत्रसंचालन रोशनी गोडबोले यांनी केले.

पीसीइटी अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, युवा उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीसीओइ संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी तसेच बोट चे संचालक पी. एन. जुमले, उपसंचालक एन. एन. वडोदे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले होते.

या जॉब फेअरच्या यशस्वी आयोजनात पीसीइटी सेंट्रल प्लेसमेंट सेलचे अधिष्ठाता डॉ. शितलकुमार रवंदळे, प्रा. संदीप पिल्लेवार, प्रा. ऋषिकेश पांडे, प्रा. विजय टोपे, प्रा. दीपक वाघ, प्रा. हीना शर्मा, प्रा. डेन्झेटा लोबो, प्रा. पायल काळे, मंगेश काळभोर यांच्यासह २०० हून अधिक विद्यार्थी प्रतिनिधींनी परिश्रम घेतले.

# हिवताप दिनानिमित्त शनिवारी जनजागृती रॅली

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महापालिका आरोग्य विभागांतर्गत नागरी हिवताप योजनेच्या वतीने जागतिक हिवताप दिनानिमित्त शहरात मलेरिया निर्मूलनासाठी विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. या मोहिमेअंतर्गत शनिवार, दि. २५ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता जनजागृती रॅली काढण्यात येणार आहे.

ही रॅली महापालिका परिसरातून सुरू होऊन चार हुतात्मा पुतळामार्गे नवी पेठ येथे पोहोचणार आहे. रॅलीच्या माध्यमातून नागरिकांमध्ये हिवताप प्रतिबंधात्मक उपायांविषयी जागरूकता निर्माण केली जाणार आहे.

सोलापूर शहर मलेरियामुक्त करण्यासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग अत्यंत आवश्यक असल्याचे महापालिका आयुक्त डॉ. सचिन अम्बासे, अतिरिक्त आयुक्त तथा आरोग्य नियंत्रण अधिकारी वीणा पवार, उपायुक्त आशिष लोकरे आणि आरोग्याधिकारी डॉ. राखी माने यांनी आवाहन केले आहे. नागरिकांनी प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे काटेकोर पालन करावे, असेही त्यांनी सांगितले.



**मलेरियाची लक्षणे व प्रतिबंधक उपाय**

थंडी वाजून तीव्र ताप येणे, डोकेदुखी, अंगदुखी, उलट्या होणे तसेच घाम येऊन ताप उतरणे ही मलेरियाची प्रमुख लक्षणे आहेत. अशी लक्षणे आढळल्यास विलंब न करता नजीकच्या शासकीय रुग्णालयात किंवा नागरी आरोग्य केंद्रात जाऊन मोफत तपासणी व उपचार करून घ्यावेत.

हिवतापापासून बचावासाठी घराभोवती पाणी साचू देऊ नये. आठवड्यातून एक दिवस 'कोरडा दिवस' पाळून पाणी साठवणारी भांडी, कुलर व कुंड्या स्वच्छ ठेवाव्यात. तसेच झोपताना मच्छरदानीचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# सोलापूरमधील अल्पवयीन माता प्रकरण; बालहक्क आयोगाचे तातडीच्या कारवाईचे निर्देश

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** बालविवाह, लैंगिक अत्याचार आणि सामाजिक-आर्थिक कारणांमुळे अल्पवयीन मुलींना मातृत्वाचा सामना करावा लागणे हे बालहक्कांचे गंभीर उल्लंघन आहे. असे नमूद करत जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली महिला व बाल विकास, आरोग्य, पोलीस आणि शिक्षण विभागाचे संयुक्त विशेष पथक स्थापन करून एक ते दीड महिन्यांत कृती आराखडा सादर करण्याचे निर्देश राज्य बाल हक्क आयोगाचे अध्यक्ष ॲड. संजय विष्णू पुराणिक यांनी दिले.

सोलापूर जिल्ह्यातील अल्पवयीन मातांचे प्रकरण राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या निदर्शनास आले असून हे प्रकरण अत्यंत गंभीर व संवेदनशील असल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे. या संदर्भात आयोगाचे अध्यक्ष ॲड. संजय विष्णू पुराणिक यांच्या अध्यक्षतेखाली सुनावणी पार पडली. यावेळी सचिव पंकज देवरे (भा.प्र.से.), सदस्य गीतांजली बुटी, शुभांगी तांबट, संजय लाखे पाटील, अतुल देसाई, प्रविण भुजाडे, मिलन जंगम तसेच अवर सचिव वंदना जैन उपस्थित होते.



सुनावणीदरम्यान प्रकरणाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. प्राथमिक माहितीनुसार काही घटनांमध्ये बालविवाह, लैंगिक अत्याचार आणि सामाजिक-आर्थिक कारणांचा संबंध असल्याचे समोर आले आहे. अल्पवयीन मुलींना मातृत्वाचा सामना करावा लागणे हे बालहक्कांचे गंभीर उल्लंघन असल्याचे आयोगाने नमूद केले.

आयोगाने जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली महिला व बाल विकास, आरोग्य, पोलीस आणि शिक्षण विभागाचे संयुक्त विशेष पथक स्थापन करून एक ते दीड महिन्यांत कृती आराखडा सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

तसेच सर्व अल्पवयीन मातांना आवश्यक वैद्यकीय, पोषण व समुपदेशन सुविधा उपलब्ध करून देणे. संबंधित मुलींचे शिक्षण खंडित होऊ नये यासाठी विशेष उपाययोजना, पोक्सो अधिनियम, २०१२ व बालविवाह प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हे नोंदवून दोषींवर कठोर कारवाई करणे, चाईल्ड वेलफेयर कमिटी मार्फत प्रकरणांचा नियमित आढावा घेणे तसेच जिल्हास्तरावर जनजागृती मोहिमा राबविण्याचेही निर्देश यावेळी देण्यात आले.

याशिवाय, राजस्थानच्या धर्तीवर लग्नपत्रिकेत वधू-वरांची जन्मतारीख नमूद करणे बंधनकारक करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाला पाठविण्यात येणार असल्याची माहिती आयोगाने दिली. आयोगाने संबंधित यंत्रणांना कडक निर्देश देतानाच नागरिकांनाही बालविवाह, बालमजुरी व बाल लैंगिक अत्याचारासंबंधी माहिती तात्काळ प्रशासनाला देण्याचे आवाहन केले आहे, माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येते.

# कुंभमेळा २०२७ साठी 'एआय'चा व्यापक वापर करण्याचा निर्णय



**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होणारा सिंहस्थ कुंभमेळा २०२७ अधिक सुरक्षित, सुरळीत आणि तंत्रज्ञानाधिष्ठित करण्यासाठी नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाने कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) व्यापक वापर करण्याचा निर्णय घेतला आहे. या अनुषंगाने मुंबईत नुकतीच उच्चस्तरीय कार्यशाळा पार पडली. या बैठकीत राज्यातील वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, पोलीस अधिकारी तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील तंत्रज्ञान कंपन्यांचे प्रतिनिधी एकत्र आले होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तंत्रज्ञानाला प्रशासनाचा कणा मानत कुंभमेळा अधिक सक्षम आणि आधुनिक करण्याचा दृष्टिकोन मांडला आहे. त्याच पार्श्वभूमीवर ही उच्चस्तरीय चर्चा सुरू असून कुंभ २०२७ हा देशातील सर्वात तंत्रज्ञान-सक्षम कुंभमेळा करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

या कार्यशाळेला मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्र्यांचे मुख्य सल्लागार कौस्तुभ धवसे, नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, आयजी राजेश प्रधान, कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह, डीआयजी (वायरलेस) जी. श्रीधर, एसपी (वायरलेस) राजा रामास्वामी, नाशिक महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त अमित रंजन आणि नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाचे अतिरिक्त आयुक्त कमलाकर रणदिवे आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मेटा, गुगल, मायक्रोसॉफ्ट, एमआयटी मीडिया लॅब, भाषिनी, सोकेट.एआय, अद्या. एआय यांसारख्या आघाडीच्या तंत्रज्ञान कंपन्या आणि संस्थांचे तज्ज्ञही या चर्चेत सहभागी झाले. कुंभमेळ्यातील गदीर्चे व्यवस्थापन, वाहतूक नियंत्रण, आरोग्य सेवा आणि आपत्कालीन प्रतिसाद यासाठी एआयचा नेमका कसा उपयोग होऊ शकतो, यावर सखोल चर्चा झाली.

नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाने 'कुंभ एआय स्टॅक' ही संकल्पना मांडली असून, हजारो सीसीटीव्ही कॅमेरे, ड्रोन, सेन्सर्स आणि मोबाईल नेटवर्कमधील माहितीचे विश्लेषण करून तात्काळ निर्णय घेण्याची क्षमता या प्रणालीत असेल. त्यामुळे गर्दी वाढण्यापूर्वीच तिचा अंदाज घेऊन उपाययोजना करणे शक्य होणार आहे.

नाशिक शहरात सध्या सुमारे १३०० सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत असून त्यात आणखी ४००० कॅमेऱ्यांची भर पडणार आहे. यासोबतच स्मार्ट ट्रॅफिक सिस्टीम, पार्किंग व्यवस्था आणि पर्यावरणीय सेन्सर्स यांसारखी पायाभूत सुविधा आधीच उपलब्ध आहे. कुंभमेळ्यासाठी या सर्व यंत्रणांचे एकत्रीकरण करण्यात येणार आहे.

# विधानपरिषदेच्या १० जागांसाठी १२ मे रोजी मतदान व मतमोजणी

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारे होणाऱ्या नऊ जागांकरिता भारत निवडणूक आयोगाने द्विवार्षिक निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. या नऊ सदस्यांची मुदत 13 मे 2026 रोजी संपणार आहे. त्याचप्रमाणे डॉ. प्रज्ञा सातव यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या विधानपरिषदेच्या एका जागेसाठी निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. भारत निवडणूक आयोगाने नऊ जागांसाठी द्विवार्षिक निवडणूक तर एक जागेसाठी पोटनिवडणूक कार्यक्रम घोषित केला आहे. या एकूण 10 जागेसाठी मंगळवार 12 मे 2026 रोजी सकाळी 9 ते दुपारी 4 वाजेपर्यंत मतदान तर सायंकाळी 5 वाजल्यानंतर मतमोजणी करण्यात येणार आहे.

विधानपरिषद सदस्य संजय केणेकर, नीलम गोऱ्हे, उद्धव ठाकरे, संदीप जोशी, दादाराव केचे, अमोल मिटकरी, रणजितसिंह मोहिते-पाटील, राजेश राठोड आणि शशिकांत शिंदे या नऊ सदस्यांच्या सदस्यत्वाची मुदत 13 मे 2026 रोजी संपणार आहे. त्याचप्रमाणे विधानपरिषद सदस्य डॉ.प्रज्ञा सातव यांच्या सदस्यत्वाची मुदत 27 जुलै 2030 रोजी संपणार आहे.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# NSDC मार्फत इस्त्राईलमध्ये "Renovation Construction" क्षेत्रात रोजगाराची संधी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ (NSDC) यांच्या माध्यमातून इस्त्राईल येथे "Renovation Construction" क्षेत्रात विविध पदांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.

**उपलब्ध पदांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :**

१) Plastering Work - १००० जागा
२) Ceramic Tiling - १००० जागा
३) Drywall Worker - ३०० जागा
४) Mason - ३०० जागा

या संधींसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांचे वय २५ ते ५० वर्षे दरम्यान असावे तसेच इंग्रजी भाषेचे सामान्य ज्ञान आवश्यक आहे. उमेदवाराकडे संबंधित क्षेत्रात किमान ३ वर्षांचा कामाचा अनुभव असणे अनिवार्य आहे. तसेच उमेदवाराने यापूर्वी इस्त्राईलमध्ये काम केलेले नसावे. उमेदवाराचा जोडीदार, पालक किंवा मुले इस्त्राईलमध्ये सध्या कार्यरत नसावीत किंवा तेथे रहिवासी नसावेत, अशी अटही लागू आहे.

या रोजगार संधींबाबत सविस्तर माहिती https://maharashtrainternational.com या संकेतस्थळावर "Latest Jobs" या विभागात उपलब्ध आहे. इच्छुक उमेदवारांनी संबंधित संकेतस्थळावर भेट देऊन ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावा.

तसेच, जिल्ह्यातील सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्था व तांत्रिक महाविद्यालयांनी पुढाकार घेऊन या रोजगार संधींची माहिती जास्तीत जास्त उमेदवारांपर्यंत पोहोचवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नॉर्थ कोर्ट, पार्क चौक, सोलापूर येथे किंवा दूरध्वनी क्रमांक (०२१७) २९९२९५६ वर संपर्क साधावा, असे आवाहन सहायक आयुक्त कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता, सोलापुर श्रीमती संगीता खंदारे यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये केले आहे.

# राज्यात लवकरच ५३ स्वयंचलित वाहन तपासणी केंद्रे उभारण्याचे काम तातडीने पूर्ण करा- मुख्यमंत्री




**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील वाहनांची फिटनेस तपासणी केवळ नोंदणीकृत स्वयंचलित वाहन तपासणी केंद्राद्वारे (ऑटोमेटेड टेस्टिंग स्टेशन - एटीएस) केली जावी, यासाठी राज्यात ५३ स्वयंचलित वाहन तपासणी केंद्रे उभारण्याचे काम प्रगतीपथावर असून ही कामे तत्काळ पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

राज्यात स्वयंचलित वाहन तपासणी केंद्रे उभारण्यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवासस्थानी बैठक झाली. या बैठकीस परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, परिवहन राज्यमंत्री माधुरी मिसाळ, अपर मुख्य सचिव संजय सेठी, परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, उपसचिव चेतन निकम, एआरएआय. उपसंचालक मकरंद पाठक आदी उपस्थित होते.

केंद्रीय मोटार वाहन नियम ६२ मध्ये २३ सप्टेंबर २०२३ रोजीच्या अधिसूचनेनुसार परिवहन संवर्गातील सर्व वाहनांची फिटनेस चाचणी केवळ नोंदणीकृत स्वयंचलित वाहन तपासणी केंद्रांमार्फत करणे १ एप्रिल २०२५ पासून अनिवार्य करण्यात आले आहे. त्यामुळे आता पारंपरिक मानवी तपासणी पद्धती बाद होणार आहे. याच अनुषंगाने राज्यात ७ केंद्रे पूर्ण झाली असून उर्वरित ३७ स्वयंचलित वाहन तपासणी केंद्रे ऑगस्ट अखेर कार्यान्वित होतील आणि प्रलंबित तपासणी केंद्राबाबत अन्य विभागाशी समन्वयाने कार्यवाही करून तातडीने ती केंद्रे सुरू करण्याबाबतचे नियोजन करावे, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

राज्यातील स्वयंचलित वाहन तपासणी केंद्रे पूर्णत्वास न आल्याने राज्यातील काही परिवहन कार्यालयांच्या 'परिवहन/वाहन'पोर्टल प्रवेशावर केंद्र सरकारने टप्प्याटप्प्याने निर्बंध लागू केले आहेत. या निर्णयामुळे वाहनधारक व वाहतूकदारांना अडचणी निर्माण होत असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोर्टल प्रवेश तातडीने पुनर्संचयित करण्याची मागणी केंद्र शासनाकडे केली आणि केंद्रानेही यास सकारात्मक प्रतिसाद देऊन निर्बंध उठविण्यात आले.

एटीएस प्रणालीमुळे वाहन तपासणी प्रक्रिया स्वयंचलित, संगणकीकृत आणि पारदर्शक

राज्यात सध्या सुमारे ४.३३ कोटी वाहने असून, त्यापैकी ३६.८० लाख वाहने परिवहन प्रवगार्तील आहेत. यातील सुमारे ९ लाख वाहनांना दरवर्षी फिटनेस चाचणी करणे आवश्यक ठरणार आहे. एटीएस प्रणालीमुळे वाहन तपासणी प्रक्रिया पूर्णपणे स्वयंचलित, संगणकीकृत आणि पारदर्शक होणार असून, मानवी हस्तक्षेप कमी झाल्याने अचूकतेत वाढ होणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

महाराष्ट्रात एकूण ५३ शासकीय एटीएस केंद्रे उभारण्यात येत असून, देशातील एकूण २१४ केंद्रांपैकी सुमारे २५ टक्के केंद्रे राज्यात असणार आहेत. या प्रकल्पासाठी पाच वर्षांच्या संचालन व देखभालीसाठी सुमारे १,०३५ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून, केंद्र शासनाकडून ३३७.७४ कोटी रुपयांचे अनुदान मिळाले असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

# सोलापूर महानगरपालिकेत आता 'कलर कोड' पार्किंग!

## बेशिस्त वाहनधारकांना लगाम, आयुक्तांचे नवे आदेश



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिका परिसरात येणाऱ्या नागरिकांची आणि कर्मचाऱ्यांची वाहने आता शिस्तबद्ध पद्धतीने पार्क केली जाणार आहेत. पालिकेच्या मुख्य इमारतीसह (इंद्रभुवन परिसर) आजूबाजूला होणारी वाहनांची गर्दी आणि विद्रुपीकरण रोखण्यासाठी आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी नवीन 'पार्किंग नियोजन' जाहीर केले आहे.

**दफकोड आणि कलर कोडची सक्ती**

महानगरपालिकेने आता प्रत्येक विभागासाठी विशिष्ट 'कलर कोड' आणि 'दफ कोड' असलेले पास बंधनकारक केले आहेत. संगणक विभागामार्फत सर्व अधिकारी, कर्मचारी, पदाधिकारी आणि पत्रकारांच्या वाहनांची नोंदणी करून त्यांना पार्किंग कलर कोडप्रमाणे दफ कोड असलेले पास दिले जातील.

असे असेल पार्किंग नियोजन

तपकिरी रंगः प्रतिनियुक्तीवरील अधिकारी (अतिरिक्त आयुक्त ते सहाय्यक आयुक्त व इतर विभाग प्रमुख).

नारंगी रंगः मा. पदाधिकारी, मा. सदस्य आणि पत्रकार (कौन्सील हॉल शेजारी).

आकाशी निळाः मनपा मधील इतर अधिकारी (ICCC शेजारील जागा). जांभळा रंगः नगर अभियंता, नगर रचना व इतर विभागाचे कर्मचारी.

हिरवा रंगः लेखा विभाग आणि सा.प्र. विभाग कर्मचारी.

नागरिकांसाठीः हुतात्मा स्मृती मंदिर व मनपाच्या मागील बाजूस (ICCC शेजारी) पार्किंग व्यवस्था असेल.

**सुरक्षा आणि देखरेख**

पार्किंगच्या ठिकाणी शिस्त लावण्यासाठी सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच, सुरक्षेच्या कारणास्तव सर्व पार्किंग झोनमध्ये CCTV कॅमेरे लावले जाणार असून नगर अभियंता विभागाकडून वाहने लावण्यासाठी पांढरे पट्टे ओढले जातील. या नियमांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना आयुक्तांनी सर्व खातेप्रमुखांना दिल्या आहेत.

# १०० खोके, कच्च्या घरांच्या अतिक्रमणांवर हातोडा



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** अक्कलकोट नगरपालिकेने बेडर कन्हैया चौक परिसरातील अतिक्रमणे हटविण्यास आज मोठ्या फौजफाट्यासह आणि कडेकोट पोलिस बंदोबस्तात सुरुवात केली. या कारवाईत सुमारे १०० खोके तसेच कच्च्या घरांवरील अतिक्रमणे हटविण्यात आली.

या कारवाईमुळे शहरात खळबळ उडाली आहे. अनेकांनी स्वतःहून अतिक्रमणे काढली, तर काहींची अतिक्रमणे नगरपालिकेने हटविली.

नगरपालिकेने गेल्या आठ दिवसांपासून अतिक्रमणधारकांना जागा रिकामी करण्याबाबत सूचना दिल्या होत्या.

त्यानुसार काही दुकानदारांनी स्वखुशीने अतिक्रमणे काढली. उर्वरित अतिक्रमणांवर आज जेसीबीच्या सहाय्याने कारवाई करण्यात आली. काही ठिकाणी किरकोळ वादविवादही झाले.

या अतिक्रमण हटाव मोहिमेत नगरपालिकेचे सुमारे ६० अधिकारी व कर्मचारी, तसेच ११० पोलिस कर्मचारी सहभागी झाले होते. मंगरुळे चौक ते बेडर कन्हैया चौक आणि बेडर कन्हैया चौक ते माणिक पेठ या मार्गावरील अतिक्रमणांवर कारवाई करण्यात आली.

उद्याही या भागातील उर्वरित अतिक्रमणे हटविण्यात येणार असल्याचे प्रशासनाने सांगितले. कारवाईवेळी तहसीलदार विनायक मगर, नगरपालिकेचे मुख्याधिकारी रमाकांत डाके, अभिषेक काकडे, शुभम माहुरे, शैलेश बिराजदार, उत्कर्ष उकरंडे, नितीन शेंडगे, शुभम माने, मनोज ईश्वरकट्टी यांच्यासह अक्कलकोट उत्तर पोलिस ठाण्याचे निरीक्षक दीपक भिताडे, सहायक निरीक्षक नीलेश बागाव, पोलिस उपनिरीक्षक पांडुरंग पवार आदी उपस्थित होते. सोलापूरहून राखीव पोलिस बलाची तुकडीही पाचारण करण्यात आली होती.

**मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यांवरील अतिक्रमणे हटविणार**

अक्कलकोट शहरातील अतिक्रमण हटाव कारवाईसाठी पाच जेसीबी, दोन पोकलेन, दहा ट्रॅक्टर आणि पाच हायवा वाहने वापरण्यात आली. अक्कलकोटच्या इतिहासात इतक्या मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण हटविण्याची कारवाई प्रथमच करण्यात आल्याचे सांगितले जाते.

तीर्थक्षेत्र अक्कलकोटच्या विकासासाठी मंदिराकडे जाणाऱ्या प्रमुख रस्त्यांवरील अतिक्रमणे मोठ्या प्रमाणावर हटविण्यात येणार असल्याचे नगरपालिका सूत्रांनी सांगितले.

# एस टी बसची दुचाकीला धडक, दुचाकीस्वार जखमी

**खंडाळी (कटूसत्य वृत्त):-** २२ एप्रिल २०२६ रोजी सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर खंडाळी पाटी जवळ एक दुचाकी क्रमांक MH 13 CX 2533 महामार्ग ओलांडताना येणारी वाहने न बघता गाडी पुढे घेत असताना सोलापूर वरून पुण्याकडे जात असलेल्या एका एस टी बस क्रमांक MH 09 एट 1295 समोर अचानक आल्यामुळे एस टी बस ने धडक दिल्यामुळे झालेल्या अपघातात एक दुचाकीस्वार व्यक्तीच्या डोक्याला मार लागून जखमीं झाला असून सदर अपघातामध्ये जखमीं झालेल्या व्यक्तीला देवडी येथील खासगी वाहनातून मोहोळ येथील खासगी रुग्णालयात पुढील उपचारासाठी दाखल करण्यात आले असून या अपघाताची माहिती मिळताच वरवडे टोल नाका येथील रुग्णवाहिका पथक डॉ महेंद्र ताकतोडे आणि रुग्णवाहिका चालक नागनाथ भालेराव तसेच ग्रस्तीपथक प्रमुख संतोष खडके ग्रस्तीवाहनचालक अभिजित गुजरे, सहाय्यक विनोद भोसले आणि मोडनिंब महामार्ग पोलिस मदत केंद्राचे प्रभारी अधिकारी उमेश पवार (PSI) आणि त्यांचे कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले असून, या अपघातामध्ये जखमी झालेल्या व्यक्तीचे नाव चंद्रकांत निवृत्ती थोरात वय ६५ वर्ष, रा देवडी, तालुका मोहोळ, जिल्हा सोलापूर असे असून सदर अपघाताची माहिती मोहोळ पोलिस स्टेशन येथील अपघात विभागाचे अधिकारी क्षिरसागर यांना दिली असल्याची माहिती वरवडे टोल नाका येथील ग्रस्तीपथकाचे प्रमुख संतोष खडके यांनी दिली आहे.

# पंतप्रधान कार्यप्रशिक्षण योजनेच्या तिसऱ्या टप्प्याची सुरुवात

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** केंद्र सरकारच्या पंतप्रधान कार्यप्रशिक्षण योजनेच्या तिसऱ्या टप्प्याची घोषणा करण्यात आली असून देशभरातील ३५ हजार ४८० तरुणांना कार्यप्रशिक्षणाची संधी उपलब्ध होणार आहे. या माध्यमातून सोलापूर जिल्ह्यातील तरुणांना नामांकित कंपन्यांमध्ये प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे. या योजनेअंतर्गत माहिती तंत्रज्ञान, बँकिंग व वित्तीय सेवा, पायाभूत सुविधा, रिटेल, वाहननिर्मिती, औषधनिर्माण, उत्पादन, माध्यम, शिक्षण, पर्यटन व आरोग्य आदी विविध क्षेत्रांमध्ये कार्यप्रशिक्षण उपलब्ध करून देण्यात येत आहे. याकार्य प्रशिक्षणाचा कालावधी ६ ते ९ महिने असून प्रशिक्षणार्थींना दरमहा रुपये ९,००० इतके विद्यावेतन दिले जाणार आहे.

तसेच प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर उमेदवारांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे.

या योजनेसाठी १८ ते २५ वयोगटातील उमेदवार पात्र असून शैक्षणिक पात्रता दहावी, बारावी, आयटीआय, पदविका किंवा पदवीधर अशी असावी.

पूर्णवेळ नोकरी करणारे किंवा नियमित शिक्षण घेत असलेले उमेदवार अपात्र ठरणार आहेत. मात्र, ऑनलाइन किंवा दूरस्थ शिक्षण घेणारे उमेदवार पात्र राहतील, अशी माहिती जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या मार्फत देण्यात येत आहे.

इच्छुक उमेदवारांनी https://pminternship.mca.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करून अर्ज करावा.

विविध शैक्षणिक पात्रतेनुसार रिक्त पदे उपलब्ध आहेत. तसेच सोलापूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त आस्थापना व कंपन्यांनी या योजनेत सहभागी व्हावे.

नोंदणी प्रक्रिया पुढीलप्रमाणे आहेः
संकेतस्थळावर भेट देऊन "Login/Register" पर्याय निवडावा
"New User/Register Now" वर क्लिक करून मोबाईल क्रमांक नोंदवावा
प्राप्त OTP टाकून पडताळणी पूर्ण करावी
नवीन पासवर्ड तयार करून नोंदणी पूर्ण करावी

अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूर येथे दूरध्वनी क्रमांक (०२१७-२९५०९५६) वर संपर्क साधावा, असे आवाहन सहायक आयुक्त कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता, सोलापूर श्रीमती संगीता खंदारे यांनी केले आहे.

# हिवताप दिनानिमित्त शनिवारी जनजागृती रॅली



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महापालिका आरोग्य विभागांतर्गत नागरी हिवताप योजनेच्या वतीने जागतिक हिवताप दिनानिमित्त शहरात मलेरिया निर्मूलनासाठी विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. या मोहिमेअंतर्गत शनिवार, दि. २५ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता जनजागृती रॅली काढण्यात येणार आहे.

ही रॅली महापालिका परिसरातून सुरू होऊन चार हुतात्मा पुतळामार्गे नवी पेठ येथे पोहोचणार आहे. रॅलीच्या माध्यमातून नागरिकांमध्ये हिवताप प्रतिबंधात्मक उपायांविषयी जागरूकता निर्माण केली जाणार आहे. सोलापूर शहर मलेरियामुक्त करण्यासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग अत्यंत आवश्यक असल्याचे महापालिका आयुक्त डॉ. सचिन अम्बासे, अतिरिक्त आयुक्त तथा आरोग्य नियंत्रण अधिकारी वीणा पवार, उपायुक्त आशिष लोकरे आणि आरोग्याधिकारी डॉ. राखी माने यांनी आवाहन केले आहे. नागरिकांनी प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे काटेकोर पालन करावे, असेही त्यांनी सांगितले.

**मलेरियाची लक्षणे व प्रतिबंधक उपाय**

थंडी वाजून तीव्र ताप येणे, डोकेदुखी, अंगदुखी, उलट्या होणे तसेच घाम येऊन ताप उतरणे ही मलेरियाची प्रमुख लक्षणे आहेत. अशी लक्षणे आढळल्यास विलंब न करता नजीकच्या शासकीय रुग्णालयात किंवा नागरी आरोग्य केंद्रात जाऊन मोफत तपासणी व उपचार करून घ्यावेत.

हि व ता पा पा सू न बचावासाठी घराभोवती पाणी साचू देऊ नये. आठवड्यातून एक दिवस 'कोरडा दिवस' पाळून पाणी साठवणारी भांडी, कुलर व कुंड्या स्वच्छ ठेवाव्यात. तसेच झोपताना मच्छरदानीचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.


## Classified - छोटी जाहीरात

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नंपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय

**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

**बोअरवेल**

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**पाहिजेत**

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

**वर-वधू**



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.


## कटूसत्य शब्दकोडे

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ४ | ■ | ५ | | ६ | | ७ | ■ |
| | ■ | ८ | | | ■ | | ■ | | ■ | ९ | १० |
| | ■ | ११ | | ■ | १२ | | | ■ | ■ | १३ | |
| १४ | १५ | | ■ | १६ | | | ■ | ■ | १७ | ■ | |
| ■ | | ■ | १८ | | ■ | | ■ | १९ | | २० | |
| २१ | | ■ | ■ | २२ | २३ | | ■ | | ■ | २४ | |
| | ■ | २५ | | | | ■ | २६ | | २७ | | ■ |
| २८ | | | ■ | | ■ | ■ | २९ | | | ■ | ■ |
| | ■ | ■ | ३० | ■ | ३१ | | | ■ | ३२ | ३३ | ३४ |
| ■ | ३५ | | | ३६ | | ■ | ३७ | ३८ | ■ | ३९ | |
| ४० | | ■ | ■ | | ■ | ४१ | ■ | ४२ | ४३ | ■ | |
| ■ | ४४ | | | ■ | ४५ | | | | | | |

**उभे शब्द :** १) एकवीस दुणे
२) लिंबू पाण्याचे पेय ३) कजरा उलट लिहा ४) तय उलट लिहा
५) कोकणातील एक स्ट्राँग नेते
६) परंतु (हिंदीत) ७) पत्र (इंग्रजीत)
१०) ग्रॅज्युएट (मराठीत)
१२) थंड, शीत १५) ॲडव्होकेट (मराठीत)
१६) राजाबाबू चित्रपटातील गोविंदाचा पालक असलेला अभिनेता १७) बारा वर्षांचा काळ १९) एक फळ २०) देखणा, रूबाबदार व्यक्तिमत्त्व २१) फेब्रुवारी (हिंदीत) २३) सहा उलट लिहा
२५) झी टीव्हीवरील विनोदी मालिका-चला ** येऊ द्या २६) कॉलनी (मराठीत) २७) वडिलोपार्जित असलेला संपत्तीचा हक्क
३०) याचे कणीस भाजून खातात
३१) उत्सवाचा दिवस
३३) वस्तूची विक्री ३४) हिंदी सिनेसृष्टीतील एक अभिनेता, दीपिकाचा पती-**** सिंह ३५) दैत्य, दानव ३६) राखण, एकनाथ खडसेंच्या सून-** खडसे ३८) रोख
४१) वाट, मार्ग (हिंदीत)
४३) उदार मनाने देणे, ** करणे

**आडवे शब्द :**
१) बिहारमधील एक प्रख्यात जिल्हा व लोकसभा मतदारसंघ
५) महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष
८) चांदी ९) बस अथवा ट्रकच्या केबिनचे छत
११) बगळा १२) गाणे गाणारा १३) दात, दंत
१४) नवऱ्याची दुसरी बायको १६) सबब, निमित्त
१८) शरीर (हिंदीत) १९) गुन्हा २१) सब्र का ** मिठा होता है
२२) एक भारतीय फलंदाज-अजिंक्य *** २४) तरचा साथीदार
२५) निश्चित, खात्रीशीर २६) श्रीरामाने चौदा वर्षे भोगला तो
२८) जंगल अथवा डोंगराला लागलेली आग २९) माहेरच्या विरूध्दार्थी शब्द
३१) सल्ला (हिंदीत) ३२) शुगर (मराठीत)
३५) पॉलिटिक्स (मराठीत) ३७) शरीर, काया ३९) परंतु, शर्थ
४०) चित्त, ध्यान, लाख
४२) हनुमानाच्या हातातील शस्त्र
४४) दहा गुणिले सात
४५) पुणे लगतचा एक जिल्हा

## सुडोकु - 233

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 6 | | 3 | | | 4 | 1 | |
| 1 | 8 | 5 | | 2 | | 7 | | 3 |
| | | | 5 | | | 9 | 2 | 8 |
| | 9 | 6 | 8 | | 2 | | 5 | 7 |
| 2 | 1 | | | 4 | | 3 | | |
| | 5 | | | | 6 | | 8 | 4 |
| 5 | | | | | 4 | 6 | | |
| | | | 6 | 1 | 3 | 5 | 4 | |
| | | 9 | | | 7 | | | |

# प्रलंबित मागण्यांसाठी राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचा दुसऱ्या दिवशीही संप सुरू

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या १८ प्रलंबित मागण्यांसाठी मंगळवार (दि. २१ एप्रिल) पासून पुकारण्यात आलेला बेमुदत संप बुधवारी दुसऱ्या दिवशीही सुरू राहिला. संपाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचा दावा कर्मचाऱ्यांच्या संघटनांनी केला असून, शंभर टक्के सहभाग असल्याचे त्यांनी सांगितले.



दरम्यान, या संपातून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी माघार घेतली आहे. तरीही काही अत्यावश्यक सेवा सुरळीत सुरू ठेवण्यात आल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराज शासकीय रुग्णालयातील पोस्टमार्टम विभाग, ऑक्सिजन पुरवठा विभाग तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील ध्वजारोहण व ध्वज उतरविण्याचे काम करणारे कर्मचारी नियमितपणे कर्तव्य बजावत असल्याची माहिती महसूल संघटनेचे अध्यक्ष रवी नष्टे व माजी अध्यक्ष शंतनु गायकवाड यांनी दिली.

संपकरी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबतचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाकडे पाठविण्यात आले आहे. मात्र, संपामुळे शासकीय कार्यालयांमधील कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता असून, नागरिकांची कामे खोळंबण्याची चिन्हे आहेत.

या संपात महसूल, कारागृह, वाहनचालक, लेखा व कोषागार, आयटीआय, आरोग्य तसेच तालुका स्तरावरील विविध विभागांतील कर्मचारी सहभागी झाले आहेत. शासनाने मागण्यांबाबत अधिकृत निर्णय (जीआर) जारी करेपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याचा निर्धार आंदोलकांनी व्यक्त केला आहे.

राज्यभरातील सुमारे १७ लाख कर्मचारी व शिक्षक गेल्या वर्षभरापासून विविध मागण्यांसाठी शासनाकडे पाठपुरावा करत आहेत. यासाठी त्यांनी ६ मार्च २०२५ रोजी धरणे आंदोलन, २० मे रोजी वॉकआऊट, ९ जुलै रोजी राज्यव्यापी निदर्शने, ११ नोव्हेंबर रोजी उग्र आंदोलन, ५ डिसेंबर रोजी शाळा बंद आंदोलन आणि ९ ते ११ डिसेंबरदरम्यान नागपूर येथे साखळी उपोषण असे विविध टप्प्यांतील आंदोलन केले होते. मात्र, शासनाकडून अद्याप ठोस निर्णय न झाल्याचा आरोप संघटनांकडून करण्यात आला आहे.

# अवकाळी पावसाचा तडाखा

## पिकांचे मोठे नुकसान



**टेंभुर्णी, (कटूसत्य वृत्त):-** माढा आणि करमाळा तालुक्यातील कंदरसह परिसराला बुधवारी सायंकाळी वादळी वाऱ्यासह गारपीट आणि मुसळधार पावसाचा जोरदार तडाखा बसला. या अवकाळी पावसामुळे आंबा, चिकू आणि केळी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून अनेक मोठी झाडे उन्मळून पडली आहेत. तसेच विजेचे खांब कोसळल्याने वीजपुरवठा खंडित झाला आहे.

दिवसभर उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना सायंकाळी अचानक बदललेल्या वातावरणाचा सामना करावा लागला. सुमारे पाचच्या सुमारास आकाशात काळे ढग दाटून आले आणि सहाच्या सुमारास तुफानी वादळी वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली. वाऱ्याचा वेग इतका प्रचंड होता की अनेक मोठी झाडे उन्मळून पडली, तर घरांवरील पत्रे उडून गेली.

आंबा आणि चिकूच्या बागांमध्ये फळांचा सडा पडल्याचे चित्र दिसून आले. त्यानंतर झालेल्या गारपिटीमुळे रस्त्यांवर पांढरी चादर पसरल्यासारखे दृश्य निर्माण झाले होते. या अवकाळी पावसामुळे उसाला मात्र काही प्रमाणात दिलासा मिळाला असून वातावरणात गारवा निर्माण झाला आहे.

सातोली येथील सुरेश गाडे, शिवाजी गाडे आणि अशोक गाडे यांच्या केळी बागांचे मोठे नुकसान झाले आहे. कंदर, केम, वशिणे, उपळवाटे आदी गावांमध्येही जोरदार पावसाने हानी केली असून गंधर्व सातवली परिसरात चक्रीवादळासारख्या वाऱ्यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली आहे.

# मोहोळ येथीत यात्रेत गोडसे बंधूकडून यात्रेकरूनां पाणी वाटप

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** श्री नागनाथ महाराज यात्रेमध्ये कै. दत्तात्रय चांगदेव गोडसे यांचे स्मरणार्थ अविनाश दत्तात्रय गोडसे प्रशासन अधिकारी जिल्हा परिषद सोलापूर व सतिश दत्तात्रय गोडसे सहाय्यक पोलीस निरिक्षक काशीमीरा पोलीस स्टेशन मुंबई यांचेतर्फे दरवर्षी प्रमाणे यात्रेकरूना पिण्याच्या पाण्याची सोय करणेत आली. यात्रेकरुना पाणी वाटप मोहोळ पंचायत समिती गट नेते संजीव खिलारे, पंचायत समिती सदस्य बाळासाहेब गायकवाड राष्ट्रमाता इंदिरा कन्या प्रशालेचे प्राचार्य सुधीर गायकवाड मुख्याध्यापक संतोष गायकवाड,



नगरसेवक सुशिल क्षीरसागर यांचे शुभहस्ते करण्यांत आले.

सदर प्रसंगी सुनिल गायकवाड, कारभारी गायकवाड, अविनाश गोडसे, सतिश गोडसे, जगदीश गोडसे, आसावरी गोडसे, आदेश गोडसे, विभावरी गोडसे, माहेश्वरी गोडसे, जान्हवी गोडसे, श्लोक गोडसे, वैष्णवी चव्हाण,शिवदत्त चव्हाण, सुरेश राऊत, आयुब इनामदार, चंद्रकांत सुळ, सुरेश माळी, अफिज सादिक इनामदार, शकील इनामदार, रुतुराज गायकवाड, बाहुबली खांडेकर, दिगंबर व्हनमाने आदि उपस्थित होते. यात्रेकरूनी गोडसे बंधूना पाणी वाटप केलेबद्दल शुभेच्छा दिल्या.

# उद्दिष्ट पूर्ण न करणाऱ्या ४७ कर्मचाऱ्यांवर महापालिकेची कारवाई

**सोलापूर, (कटूसत्य वृत):-** महापालिकेच्या उत्पन्नवाढीसाठी सुरू असलेल्या नवीन मिळकती शोध मोहिमेत उद्दिष्ट पूर्ण न करणाऱ्या ४७ कर्मचाऱ्यांवर प्रशासनाने कारवाई केली आहे. या कर्मचाऱ्यांना एकूण २८ हजार ५०० रुपयांचा आर्थिक दंड ठोठावण्यात आला असून, ही कारवाई उपायुक्त आशिष लोकरे यांनी केली आहे. महापालिकेच्या मालमत्ता कर विभागामार्फत ८ एप्रिल रोजी आदेश जारी करून सर्व संबंधित कर्मचाऱ्यांना नवीन मिळकतींचा शोध घेणे, अपार्टमेंटमधील शिल्लक फ्लॅट व गाळ्यांची नोंद करून दररोज किमान पाच मिळकतींची आकारणी करण्याचे उद्दिष्ट देण्यात आले होते. एप्रिल महिन्यात एकूण मिळकतींच्या शोध व आकारणीसाठीही विशेष लक्ष्य निश्चित करण्यात आले होते.

मात्र २१ एप्रिलपर्यंतच्या अहवालानुसार अनेक कर्मचाऱ्यांनी अपेक्षित कामगिरी केलेली नसल्याचे स्पष्ट झाले. विशेष म्हणजे संबंधित ४७ कर्मचाऱ्यांनी ८ एप्रिलपासून एकाही मिळकतीची आकारणी केली नसल्याचे निदर्शनास आले. वारंवार सूचना व आदेश देऊनही कामात सुधारणा न झाल्याने ही बाब गंभीर मानण्यात आली.

या प्रकरणी १० कर निरीक्षक व ३७ वसुली लिपिक अशा एकूण ४७ जणांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. मात्र त्यानंतरही कामगिरीत सुधारणा न झाल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५६ (२) (ड) नुसार त्यांच्यावर आर्थिक दंडाची कारवाई करण्यात आली आहे. हा दंड 'एप्रिल पेड इन मे' वेतनातून वसूल करण्यात येणार आहे.

# प्रताप क्रीडा मंडळाच्या मोफत उन्हाळी क्रीडा व कला प्रशिक्षण शिबिराचा प्रारंभ

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** ग्रामीण भागातील खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळांचे व्यासपीठ उपलब्ध व्हावे, त्यांना उत्कृष्ट प्रशिक्षण मिळावे तसेच त्यांच्या अंगी असलेल्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने प्रताप क्रीडा मंडळ, शंकरनगर-अकलूज यांच्या वतीने मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील, अध्यक्षा कु. स्वरूपाराणी मोहिते-पाटील, स्पर्धा संयोजन समिती प्रमुख सयाजीराजे मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली दि.२३ ते २६ एप्रिल या कालावधीत आयोजित केलेल्या मोफत उन्हाळी क्रीडा व



कला प्रशिक्षण शिबीराचा प्रारंभ झाला.

सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय शंकरनगर च्या मैदानावर या स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. प्रवीण ढवळे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.या वेळी मंडळाचे उपाध्यक्ष पोपटराव भोसले पाटील, संजय झंजे, सागर फुले, राष्ट्रीय खेळाडू सार्थक काळे, सुजल धडांबे, सचिव बिभीषण जाधव, कला व क्रीडा प्रशिक्षक, आदी मान्यवर प्रमूख उपस्थित होते.

सदरचे हे ४५ वे उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबीर असून शिबिरामुळे अनेक राज्य व राष्ट्रीय खेळाडू तयार झाले आहेत. प्रताप क्रीडा मंडळाने राज्यात वेगळा ठसा उमटवलेला आहे. सदरचे शिबिर विद्यार्थ्यांसाठी मोफत असून या शिबिरात रोज सकाळी ७ ते १० या वेळेत वेटलिफ्टिंग, हॉलीबॉल, ॲथलेटिक्स, कबड्डी व योगासने या खेळांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. कला शिबिरामध्ये कागदकाम व रांगोळी कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले असल्याचे उपाध्यक्ष पोपटराव भोसले पाटील यांनी सांगितले.

क्रीडा प्रशिक्षक म्हणून अरविंद वाघमोडे, संजय राऊत, उमेश भिंगे, भीमाशंकर पाटील, प्रदीप पांढरे, दादा कोकाटे, निलप्पा बनसगोळकर, यशवंत माने देशमुख, भीमराव दुधाळ, मल्हारी मगर, दादाभाई सय्यद, अनिल मोहिते, अण्णा साळुंखे, रामचंद्र लोंढे, बाळासाहेब भोसले तर कला शिबिरासाठी धन्यकुमार साळवे, सिद्धनाथ टिंगरे, दत्ता शिंदे, तानाजी काशीद, विशाल लिके, लक्ष्मण धोत्रे, शाम कुंभार, माधुरी भांगे आदी मार्गदर्शन करीत आहेत. सुत्रसंचलन संजय राऊत यांनी केले. प्रशिक्षणार्थिना मंडळाच्या वतीने खाऊ वाटप करण्यात आले.

# श्री नागनाथ महाराज यात्रेनिमित्त मुस्लिम बांधवांकडून लिंबु शरबत आणि पाणी बॉटल वाटप

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** दरवर्षीप्रमाणे याही वर्षी शहरासह भाविकांचे आराध्य दैवत असलेल्या श्री नागनाथ यात्रेनिमित्त इलीयास भाई शेख मित्र परिवार यांच्या वतीने यात्रेतील भाविकांसाठी लिंबुशरबत आणि थंड पाणी बॉटलचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम गेली अनेक वषार्पासून या मित्र परिवाराच्या वतीने राबविण्यात येत आहे. यावेळी पोलीस निरीक्षक बाजीराव पोवार पंचायत समिती



सदस्य बाळासाहेब गायकवाड, इलियासभाई शेख, दादा कुरेशी सुरज तलफदार तनवीर शेख, सद्दाम बोंगे, वासिम हरणमारे, जिशान शेख, सोनू तलाफदार, जुबेर हरणमारे उपस्थित होते.

# चिंचोली भोसे येथे रस्ता दुरुस्तीसाठी २० लाखांचा निधी मंजूर

## आ अभिजीत पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन संपन्न

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** चिंचोली भोसे, ता. पंढरपूर येथील ग्रामस्थांच्या दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या रस्ता दुरुस्तीच्या मागणीची गांभीयार्ने दखल घेत २० लाखांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या विकासकामाचे भूमिपूजन आमदार अभिजीत आबा पाटील यांच्या शुभहस्ते ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त व मोठ्या उपस्थितीत संपन्न झाले.

चिंचोली भोसे परिसरातील रस्त्याची दुरवस्था ही नागरिकांसाठी मोठी समस्या बनली होती. खराब रस्त्यांमुळे वाहतुकीत अडथळे निर्माण होत होते तसेच शेतकरी, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत होता. मात्र, आता या निधीमुळे



रस्त्याचे दर्जेदार दुरुस्ती काम हाती घेतले जाणार असून, लवकरच नागरिकांना सुकर व सुरक्षित वाहतुकीचा लाभ मिळणार आहे.

यावेळी बोलताना आमदार अभिजीत पाटील यांनी सांगितले की, 'मतदारसंघातील प्रत्येक गावाचा सर्वांगीण विकास हेच आमचे ध्येय असून, नागरिकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी आम्ही कायम कटिबद्ध आहोत. रस्ते, पाणी, वीज यांसारख्या सुविधांमध्ये कोणतीही तडजोड होऊ दिली जाणार नाही.'

या कार्यक्रमास उमेश पवार, गणेश आवटे, भीमराव पवार, शशिकांत शिंदे, परमेश्वर पवार, बाळासाहेब पवार, रामभाऊ परचंडे यांच्यासह अनेक मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कामामुळे परिसराच्या विकासाला गती मिळणार असून, ग्रामस्थांनी आमदार अभिजीत पाटील यांचे आभार व्यक्त केले आहेत.

# सिंहगड पब्लिक स्कूलमध्ये 'जागतिक पृथ्वी दिन' उत्साहात साजरा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पर्यावरण संवर्धनाचा प्रभावी संदेश देत सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, केगाव येथे 'जागतिक पृथ्वी दिन' उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

सोलापूर महानगरपालिका, शाळा प्रशासन आणि इको नेचर क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या उपक्रमांतर्गत शाळा परिसरात देशी औषधी वृक्षांची लागवड करण्यात आली. हरित सजावटीने नटलेला परिसर आणि विद्यार्थ्यांचा उत्साह यामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.






या कार्यक्रमासाठी सोलापूर महानगरपालिकेच्या उपमहापौर ज्ञानेश्वरी महेश देवकर प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते वृक्षारोपण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी बोलताना त्यांनी 'पृथ्वी आपली आई असून तिचे संरक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे,' असे सांगत विद्यार्थ्यांना पर्यावरण रक्षणासाठी सक्रिय सहभागाचे आवाहन केले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सादर केलेली घोषवाक्ये, पोस्टर प्रदर्शन आणि भाषणे विशेष आकर्षण ठरली. 'सेव्ह अर्थ, सेव्ह फ्यूचर'चा संदेश देणाऱ्या उपक्रमांना उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यासोबतच स्वच्छता अभियान राबवून विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष कृतीतून पर्यावरणप्रेम दाखवून दिले.

या प्रसंगी सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव व सिंहगड इन्स्टिट्यूट, केगावचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना पर्यावरण संवर्धनासाठी दैनंदिन जीवनातील छोट्या कृतींचे महत्त्व अधोरेखित केले. प्लास्टिकचा वापर टाळणे, पाणी बचत आणि हरित जीवनशैलीचा अवलंब करण्याचे त्यांनी आवाहन केले.

जागतिक पृथ्वी दिनानिमित्त पूर्व-प्राथमिक विभागात रंगभरण स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. तसेच पूर्व-प्राथमिक ते इयत्ता आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी रोपांचे वाटप करून जनजागृती केली. घरोघरी जाऊन कागदी पिशव्यांच्या वापराला प्रोत्साहन देण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांनी हरित प्रतिज्ञा घेऊन पर्यावरण संरक्षणाचा संकल्प केला.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात मुख्याध्यापिका शाहीन शेख यांनी पृथ्वी दिनाचे महत्त्व विशद केले. या कार्यक्रमास महाराष्ट्र शासनाचे विशेष कार्यकारी अधिकारी महेश देवकर, पर्यावरण दूत डॉ. मनोज देवकर, उपमुख्याध्यापक प्रकाश नवले, उपमुख्याध्यापिका निकहत शेख यांच्यासह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचा समारोप पर्यावरण संरक्षणाच्या सामूहिक संकल्पाने करण्यात आला. शिक्षक व विद्यार्थ्यांच्या संयुक्त सहभागामुळे हा उपक्रम केवळ उत्सव न ठरता एक प्रेरणादायी अनुभव ठरला.

# चित्रकला ही भाषेशिवाय संवाद साधते- मल्हारी माने



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** चित्रकला ही केवळ कागदावर रंग भरणे नसुन ती एक भाषा आहे. जी शब्दाशिवाय संवाद साधते.असे मत प्रशासनाधिकारी मल्हारी माने यांनी व्यक्त केले.

डॉ.पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषदेच्यावतीने शिवजयंती निमित्त आयोजित केलेल्या रंगभरण स्पधेर्चा बक्षिस वितरण समारंभ नुकताच पार पडला. यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर जि.प. सदस्य पृथ्वीराज माने, सुनिल चव्हाण, संजीव चाफाकरंडे, उल्हास बिराजदार, विनोद आगलावे,नागनाथ वडणे, सचिन चौधरी, अ.गफुर अरब आदी उपस्थित होते.

शिवजयंतीनिमित्त संघटनेच्यावतीने जिल्हास्तरीय रंगभरण स्पर्धा चार गटात पार पडली. प्रत्येक गटातुन प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ यशस्वी विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले.चित्रकला ही मनातील संकल्पना व्यक्त करते. कला माणसाचा ताणतणाव कमी करते.असे मत पृथ्विराज माने यांनी व्यक्त केले. यशस्वी विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अनिल गायकवाड, दिपक डांगे, श्रीराम जाधव,किरण गाटे, भाऊसाहेब पवार,धन्यकुमार स्वामी, सागर स्वामी यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अतुल नारकर यांनी तर दिपक डांगे यांनी आभार मानले.

# क्रीडा शिक्षक भरतीसाठी आझाद मैदानात आंदोलन

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** शालेय शिक्षण व्यवस्थेत शारीरिक शिक्षण विषयाला महत्त्व असूनही राज्य सरकारकडून दोन दशकांपासून क्रीडा शिक्षक भरतीकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. यामुळे राज्यातील हजारो बी.पी.एड. व एम.पी.एड. पदवीधर बेरोजगार आहेत. सरकारच्या अनास्थेविरोधा महाराष्ट्र राज्य युवा शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघातर्फे २७ एप्रिलपासून मुंबईतील आझाद मैदानात बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

सरकारी निर्णयानुसार क्रीडा शिक्षकांच्या १०० टक्के जागा पवित्र पोर्टलच्या माध्यमातून भरण्यात याव्यात, रिक्त पदांवर इतर विषय शिक्षकांचे समायोजन करू नये, पवित्र पोर्टल टेट २०२५ भरती प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, अशा प्रमुख मागण्या महासंघातर्फे सारकारकडे करण्यात आल्या आहेत. या आंदोलनात राज्यभरातील पात्रताधारक शिक्षकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन महासंघाचे मार्गदर्शक प्रदुम्न जोशी, सोलापूर जिल्हा अध्यक्ष श्री उमेश चव्हाण सचिव श्रीकृष्ण कोळी उपाध्यक्ष नागेश पाटील प्रदीप शिर्के व राज्याध्यक्ष संदीप मनोरे, राज्य सचिव तायाप्पा शेंडगे यांनी केले आहे.

विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक बौद्धिक विकासासह सर्वांगीण विकासासाठी हा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. त्याच माध्यमातून भविष्यातील सक्षम समाज आणि बलशाली राष्ट्र निर्मितीची पायाभरणी होत असते. मात्र, या विषयाच्या अध्यापनाचे काम करणाऱ्या क्रीडा शिक्षकांच्या पदभरतीकडे सरकारने २० वर्षापासून दुर्लक्ष केल्याने अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. याकडे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती राज्याध्यक्ष संदीप मनोरे यांनी दिली.

# सोलापूर जिल्ह्यातील आयटीआय व तांत्रिक विद्यालयांत अल्पमुदतीचे प्रशिक्षण

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत सोलापूर जिल्ह्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) व शासकीय तांत्रिक विद्यालयांमध्ये अल्पमुदतीचे प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. उपलब्ध प्रशिक्षण सुविधांचा प्रभावी वापर करून तसेच अत्याधुनिक साधनसामग्रीच्या मदतीने तज्ञ प्रशिक्षकांद्वारे अद्ययावत तंत्रज्ञानावर आधारित प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

या उपक्रमांतर्गत मागणी-आधारित अल्पमुदतीचे प्रशिक्षण आयोजित करण्यात येणार असून, उद्योग क्षेत्रासाठी आवश्यक प्रगत कौशल्यांचे प्रशिक्षण उमेदवारांना दिले जाईल. यामुळे इच्छुकांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी वाढविण्यास मदत होणार आहे.

सदर प्रशिक्षण कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी मानधन तत्वावर तज्ञ प्रशिक्षक (Expert Trainers) आवश्यक आहेत. इच्छुक तज्ञांनी आपली माहिती ऑनलाईन पद्धतीने खालील लिंकवर भरावी: https://forms.gle/2dgn@moN.JebztHCP9 तसेच, इच्छुकांनी आपली माहिती जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नॉर्थ कोट, पार्क चौक, सोलापूर येथे प्रत्यक्ष सादर करावी किंवा (०२१७) २९९२९५६ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच solapurrojgar@gmail.com या ई-मेलवरही माहिती पाठविता येईल. असे आवाहन सहाय्यक आयुक्त कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता, सोलापुर श्रीमती संगीता खंदारे यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये केले आहे.